बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | सोमवार,दि.१४ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक७२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## भारताची झुंज अपयशी

दिल्ली:वि ऑस्ट्रेलियामध्ये उपांत्य फेरीच्या दृष्टीने टी-२० विश्वचषक २०२४ मधील महत्त्वाचा सामना खेळवला जात होता. शेवटपर्यंत भारताकडून हरमनप्रीतने चांगली झुंज दिली. पण अखेरीस भारताला ९ धावांनी पराभवाचा सामना करावा लागला. भारता विरूद्धचा सामना सुरू असतानाच ऑस्ट्रेलियाचा संघ अ गटातून उपांत्य फेरीत पोहोचला होता. गट सामन्यात ऑस्ट्रेलिया अपराजित राहत सर्व चार सामने संघाने जिंकत ८ गुण मिळवले आहेत. भारत पराभूत झाल्याने त्यांचे ४ गुण आहेत.ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाने ८ बाद १५१ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताकडून शफाली वर्माने चांगली फटकेबाजी केली, पण भारताने झटपट विकेट गमावले. पॉवरप्लेमध्ये भारताने ४१ धावा केल्या, तर ६ ते १० षटकांमध्ये भारताने फक्त २६ धावा केल्या.

# ...आम्ही देखील इच्छुक पण, मुख्यमंत्र्यांचा आदेश अंतिम!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात शिंदे सरकार अनेक लोक कल्याणकारी योजना राबवित आहे. त्या योजनांचा जनतेला थेट लाभ मिळतो आहे. त्यामुळे राज्यात पून्हा शिंदे सरकार आणण्यासाठी आम्ही कामाला लागलो असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीमागे युवकांची एक मोठी ताकद उभा करण्यासाठी आमचे दौरे सुरु आहेत. बीडमध्ये काही मोठ्या नेत्यांचा शिंदे गटात प्रवेश होतो आहे.त्यामुळे बीडचे राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे. आजघडीला बीड मतदार संघात अनेक उमेदवार इच्छुक आहेत. त्यामध्ये आम्ही देखील आहोत. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आदेश अंतिम असेल.असा राजकीय स्फोट शिवसेना युवा नेते बाजीराव चव्हाण यांनी उडवून दिला.

### ...तर ग्रीन सिग्नल मिळेल!

बीड जिल्ह्यातील असंख्य शिवसैनिक त्यांचे खंदे समर्थक, कार्यकर्ते यांच्यासह युवाशक्तीची ताकद दाखवून देणार आहेत. युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांचा हा आजचा दौरा बीडसाठी महत्वपूर्ण माणला जात आहे. या कार्यक्रमात आरोग्य दूत बाजीराव चव्हाण यांना बीड विधान सभेचा ग्रीन सिग्नल मिळेल अशी चर्चा राजकीय वर्तुळात उमटत आहे.

### बाजीराव चव्हाण म्हणाले आमची ताकद दाखवू

## पत्रकार परिषदेत दिले अनेक घडामोडींचे स्पष्टीकरण

दोन मोठ्या नेत्यांचा शिवसेना शिंदे गटात होणार पक्षप्रवेश

युवावर्ग शिवसेनेला जोडण्यासाठी मराठवाड्यात दौरे

बीड शहरातील युवा सेनेच्या कार्यालयात रविवारी पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यावेळी बाजीराव चव्हाण यांनी अनेक मुद्दे स्पष्टपणे बोलून दाखविले. यावेळी बाजीराव चव्हाण यांनी बीड मतदार संघावर आपला दावा केला. आमची युवा सेना मजबूत असून एक-एक माणूस आम्ही पक्षाशी जोडला आहे. एक व्हिजन घेवून आमचे राजकारण सुरु आहे. बीड मतदार संघात ग्रीन सिग्नल मिळाला तर एक वेगळे चित्र नक्कीच असेल. यावेळी बाजीराव चव्हाण असंही म्हणाले की, आज बीडमध्ये होत असलेला युवा सेनेचा महाएल्गार आमची किती ताकद आहे ते दाखवून देईल. महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कार्यतत्परतेला प्रेरित होऊन युवावर्ग लाखोच्या संख्येने युवा सेनेसोबत उभा राहत आहे.त्यासाठी आम्ही देखील अहोरात्र काम करतो आहोत. असे स्पष्टीकरण बाजीराव चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिले.

## आज होणार कार्यक्रम...

बीड शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे आज सोमवार (दि.१४) रोजी दुपारी १२:३० वाजता युवासेनेचा अभुतपुर्व कार्यक्रम होतो आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील युवाशक्तीने लाखोच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन युवा सेनेचे युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवा सेना बीड जिल्हा प्रमुख सुमित कोळपे, युवा सेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे यांनी केले आहे.

बीड : पत्रकार परिषदेत संवाद साधत असतांना बाजीराव चव्हाण यांच्यासह आदी.

## बाजीराव चव्हाण यांचे आरोग्यात मोठे काम!

आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांचे आरोग्यात मोठे काम आहे. असून एक प्रचंड मोठी युवकांची फळी त्यांनी उभा केलेली आहे. सामान्य माणसांशी नाळ जोडून काम करत असल्याने अनेक माणसे त्यांना जोडली गेली आहेत. केवळ वरवरचे राजकारण करत नसून भूमिकात्मक पायाभरणीचे राजकारण बाजीराव चव्हाण करत आलेले आहेत. त्यामुळे युवावर्गात त्यांची छाप असून एक क्रेज देखील आहे. विशेषतः बीड जिल्ह्यात त्यांना माननारा मोठा वर्ग निर्माण झाल असून त्यांच्या कामाचे कौतूक संपूर्ण महाराष्टातून होत असल्याचे दिसून येत आहे.

## नाशिकमध्ये दोन अग्निविरांचा मृत्यू

दुःखद: राहुल गांधींचे मोदी सरकारला तीन प्रश्न?

नाशिक/पुण्यभूमी प्रतिनिधी

नाशिकच्या देवळाली कॅम्प येथील फायरिंग रेंजवर तोफखान्याच्या सरावावेळी स्फोट होऊन दोन अग्निविरांचा मृत्यू झाला आहे. या घटनेची गंभीर दखल घेत लष्कराकडून चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, या घटनेनंतर आता विरोधकांकडून पुन्हा एकदा अग्निपथ योजनेवरून केंद्रातील मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला जातो आहे. लोकसभेचे विरोधीपक्षनेते राहुल गांधीही या योजनेवरून मोदी सरकारला तीन प्रश्न विचारले आहेत.राहुल गांधी यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत या घटनेबाबत भाष्य केलं आहे. तसेच त्यांनी अग्निविरांच्या मृत्यूबाबत शोकही व्यक्त केला आहे. नाशिकमध्ये प्रशिक्षणादरम्यान दोन अग्निवीर गोहिल विश्वराज सिंग आणि सैफत शीत यांचं निधन वेदनादायी आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात मी सहभागी आहे, असं ते म्हणाले.

राहुल गांधी यांनी केंद्र सरकारला तीन प्रश्नही विचारले आहेत. या घटनेने पुन्हा एकदा अग्निवीर योजनेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत, ज्यांची उत्तर देण्यात भाजपा सरकार अपयशी ठरलं आहे. ज्याप्रमाणे कोणत्याही शहीद जवानाला आर्थिक मदत दिली जाते, त्याप्रमाणे गोहिल आणि सैफतच्या कुटुंबियांना वेळेवर भरपाई मिळेल का? असा प्रश्न राहुल गांधी यांनी उपस्थित केला आहे. पुढे बोलताना,

पान २ वर...

## भाजपचे संकटमोचक संकटात सापडले

बोंबला: गाडी अडवून जोरदार घोषणाबाजी

सावंतवाडी/पुण्यभूमी प्रतिनिधी

भाजपचे संकटमोचक पर्यटनमंत्री गिरीश महाजन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले वेळागर येथील नियोजित ताज पंचतारांकित हॉटेल प्रकल्प भूमिपूजन समारंभ स्थळी संकटात सापडले. वेंगुर्ले तालुक्यातील वेळागर येथील नियोजित ताज पंचतारांकित हॉटेल प्रकल्पाच्या भूमिपूजनास आलेल्या पर्यटनमंत्री गिरीश महाजन आणि शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांची गाडी अडवून जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी धक्काबुक्की झाली, यादरम्यान पोलिसांनी सौम्य लाठीमार केला त्यात काही महिला पुरुष जखमी झाले. दरम्यान मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलनकर्ते यांनी मागण्यांवर निर्णय घेतला जाईल असे आश्वासन दिले.वेंगुर्ले तालुक्यातील वेळागर येथील नियोजित ताज पंचतारांकित हॉटेल प्रकल्पासाठी शरदचंद्र पवार मुख्यमंत्री असताना १४३ एकर जमीन संपादन करून प्रकल्प उभा राहिला पाहिजे म्हणून पर्यटन धोरण स्वीकारले. मात्र भूमिपुत्रांनी घरे असलेल्या जमिनी वगळून पर्यटन विकास साधण्यासाठी २५ वर्ष आंदोलन, न्यायालयीन लढा सुरू ठेवला आहे. या १४३ एकर पैकी सर्वे नंबर ३९ मधील २८. ३० एकर व दुसऱ्या जमिनीतील २२ एकर जमीन वगळून इतर जमिनीवर ताज पंचतारांकित हॉटेल प्रकल्प उभा राहिला पाहिजे म्हणून सरकार दरबारी पायऱ्या झिजविल्या.शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री दिपक केसरकर यांच्या मतदारसंघात वेळागर येथील नियोजित ताज प्रकल्प उभा राहणार आहे. त्यामुळे

पान २ वर...

## नाशिकमध्ये जरांगे-भुजबळांचे समर्थक भिडले

आवाहन:शिवसृष्टी परिसरात तणावाचे वातावरण!

नाशिक/पुण्यभूमी प्रतिनिधी

नाशिकमध्ये मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ( अजित पवार गट) नेते छगन भुजबळ यांचे समर्थक आमने-सामने आले होते. यावेळी दोन्ही गटाकडून एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यामुळे शिवसृष्टी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचं बघायला मिळालं. दरम्यान, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.मिळालेल्या माहितीनुसार मनोज जरांगे पाटील नाशिकमधील शिवसृष्टीला भेट देण्यासाठी दाखल झाले होते. यावेळी छगन भुजबळ

यांचे समर्थकही याठिकाणी उपस्थित होते. मनोज जरांगे पाटील या परिसरात दाखल होताच, दोन्ही गटाच्या समर्थकांकडून एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात

पान २ वर...

## नारायण गडावर झळकले स्वागताचे होर्डिंग

मराठा आरक्षण: पुजाताई मोरे सामाजिक कार्यात सर्वात पुढे

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

नारायणगड येथे मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा नुकताच पार पडला. या दसरा मेळाव्याला रेकॉर्ड ब्रेक मराठे उपस्थित होते. दसरा मेळाव्यासाठी येणाऱ्या, मराठा बांधवांच्या स्वागतासाठी राष्ट्रवादी शरद पवार गट किसान आघाडीच्या प्रदेश अध्यक्षा पुजाताई मोरे यांनी अनेक ठिकाणी होर्डिंग लावून त्यांचे स्वागत केले. मराठा आरक्षण मुद्द्याच्या आंदोलनात पूजाताई मोरे सातत्याने आपली भूमिका मांडत आलेल्या आहेत. तसेच

पान २ वर...

# हरियाणा एक झांकी हैं

हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपाने सलग तिसऱ्यांदा विजय मिळवून इतिहास निर्माण केला. १९६६ मध्ये हरियाणा या स्वतंत्र राज्याची निर्मिती झाली. राज्याच्या स्थापनेपासून कोणत्याच राजकीय पक्षाने सरकार स्थापनेची हॅटट्रीक केली नव्हती. मतदारांनी भाजपावर विश्वास दाखवला. काँग्रेस, इंडियन लोकदल, सपा, जननायक जनता पार्टी किंवा आम आदमी पक्षापेक्षा मतदारांनी भाजपाला झुकते माप दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदींची लोकप्रियता आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची रणनिती काँग्रेसपेक्षा सरस ठरली. नरेंद्र मोदींनी जो विकसित भारताचा अजेंडा मांडला आहे, तो मतदारांना भावला. या निवडणुकीत भाजपाच्या विरोधात अनेक मुद्दे होते, भाजपाचा पराभव होणार व सत्तेवर काँग्रेस येणार असे वातावरण होते पण मोदींचा करिष्मा वरचढ ठरला. केवळ सात महिन्यांपूर्वी हरियाणाच्या नेतृत्वात भाजपाने बदल केला. मनोहरलाल खट्टर यांना केंद्रात मंत्री म्हणून नेले व मुख्यमंत्रीपदाचा मुकुट नायब सिंह सैनी यांच्या मस्तकावर चढवला. खट्टर यांच्याविरोधात लोकांमध्ये मोठी नाराजी होती. लोकसभा निवडणुकीत भाजपाला फटका बसला पुन्हा विधानसभा निवडणुकीत तसा बसू नये याची दक्षता अमित शहांनी घेतली. सैनी यांना मुख्यमंत्री करण्यासाठी त्यांचाच पुढाकार होता. खट्टर व सैनी हे दोघेही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक आहेत.

हरियाणाच्या निवडणुकीत काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी व राज्याचे माजी मुख्यमंत्री भूपिंदर सिंग हुड्डा या दोघांचा पराभव झाला असेच म्हणावे लागेल. राष्ट्रीय व प्रदेश पातळीवरील काँग्रेस नेतृत्वाला जनतेने नाकारले. काँग्रेसचा नकारात्मक प्रचार मतदारांनी धुडकावून लावला. खरं तर भूपिंदर सिंह हुड्डा यांना पक्षाने निवडणुकीत पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. ते अगोदरपासूनच मुख्यमंत्रीपदाच्या मुंडावळ्या बांधून बसले होते. नव्वदपैकी बहात्तर उमेदवार त्यांनी आपल्या मर्जीने निवडले होते. पक्षाची संघटना तर हुड्डांच्या दावणीला बांधलेली होती. हुड्डांचा फाजिल आत्मविश्वास व अहंकार यामुळे काँग्रेसच्या टप्प्यात आलेल्या विजयाचे रूपांतर पराभवात झाले. सिरसामधून निवडून आलेल्या काँग्रेसच्या खासदार कुमारी सेलजा या विधानसभा लढवायला उत्सुक होत्या. त्यांनी तशी जाहीरपणे इच्छा व्यक्त केली होती. पण हुड्डांनी त्यांना तिकीट मिळणार नाही अशी व्यवस्था केली. सेलजा या दलित नेत्या. आपल्याशी दुसरी कोणी स्पर्धक नको, याची काळजी हुड्डांनी घेतली. सेलजा यांनी नाराजी प्रकट करीत हुड्डांपासून अंतर राखले होते, या दोन नेत्यांतील शीत संघर्षाचा फटका काँग्रेसला बसला.

दुष्यत चौटाला हे खट्टर सरकारमध्ये उपमुख्यमंत्री होते. दिवंगत उपपंतप्रधान देवीलाल याचे ते पणतू. ते जननायक जनता पार्टीचे प्रमुख आहेत. अगोदर भाजपा सरकारमध्ये राहिले आणि आता भाजपाच्या विरोधात लढले. २०१९ मध्ये त्यांच्या पक्षाचे १० आमदार निवडून आले होते. तेव्हा भाजपाला बहुमताचा आकडा गाठण्यासाठी चौटाला यांच्या पक्षाची गरज होती, त्या बदल्यात त्यांनी दुष्यंत यांना उपमुख्यमंत्रीपद दिले. सन २०२०-२१ मध्ये चौटाला यांनी शेतकरी आंदोलनाला पाठिंबा दिला होता. यंदा २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाविरोधात लढताना त्यांच्या पक्षाच्या सर्व उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले. एवढेच नव्हे दुष्यंत चौटाला यांना पाचव्या क्रमांची मते मिळाली. नायब सिंह सैनी हे तुलनेने कोरा चेहरा. मुख्यमंत्री म्हणून त्यांना वेळ कमी मिळाला. पण या काळात खट्टर यांच्याविरोधातील अँटी इन्कबन्सीची धार बोथट झाली, त्याचा लाभ भाजपाला मिळाला. ८ ऑक्टोबरला सकाळी ८ वाजता हरियाणात विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू झाली तेव्हा सुरुवातीला काँग्रेस आघाडीवर असा कल येत होता. सर्व वृत्तवाहिन्या काँग्रेसची सत्ता येणार असे ओरडून सांगत होत्या. काँग्रेस ९० पैकी ६० ते ६५ जागांवर आघाडीवर असे चित्र होते, पण त्यानंतर अचानक काय घडले याचा अंदाजही कुणाला आला नाही. काँग्रेसची वेगाने पिछेहाट सुरू झाली व भाजपाची घोडदौड सुरू झाली. मग मात्र भाजपाने मागे वळून बघितले नाही. सुरुवातीच्या तासाभरात काँग्रेसमध्ये जल्लोश सुरू होता, भाजपाला मतदारांनी नाकारले म्हणून कार्यकर्ते एकमेकांना जिलेबी भरवताना दिसत होते, नंतर भाजपाची सरशी होताना दिसताच काँग्रेस कार्यालयात जल्लोषासाठी आणलेले ताशे-ढोल तसेच सोडून कार्यकर्ते गायब झाले. मोदींची जादू ओसरली असे सांगणारे दिसेनासे झाले व हरियाणात मोदींचीच जादू चालली, असे ओरडून सांगणारे हातात कमळ घेऊन नाचू लागले.

हरियाणाच्या निवडणुकीकडे साऱ्या देशाचे लक्ष होते. याच हरियाणाने देशाला आयाराम-गयाराम ही नवीन राजकीय संस्कृती दाखवून दिली. १९८६ ते १९९९ या तेरा वर्षांत हरियाणात ९ मुख्यमंत्री झाले. ओम प्रकाश चौटाला ४ वेळा मुख्यमंत्री झाले व सर्वांत कमी दिवसांचे मुख्यमंत्री म्हणूनही त्यांची नोंद झाली. दि. १२ ते १७ जुलै १९९० असे ते ५ दिवस मुख्यमंत्री राहिले.

# डॉ.गोपाल बछिरे एक हरहुन्नरी नेतृत्व

जगप्रसिद्ध उल्कानगरी लोणार सरोवर या पावन ठिकानी १२ वी पर्यंतचे शिक्षण झाले लोणार येथे उच्च शिक्षणाची सोय नसल्याने वडील भिकाजी बछिरे व मोठे भाऊ बालचंद्र बछीरे जे लोणारचे सरपंच नंतर नगरसेवक व पुढे सभापती झाले त्यांनी गोपालला संभाजीनगर येथे उच्च शिक्षणासाठी पाठविले उच्च शिक्षण घेत असताना आपल्या सोबत शिकणारे विदयर्थी शिकत असताना काम करतात महिन्याच्या स्कॉलरशिप मधून किमान ५० रुपये आई-वडिलांना पाठवतात, हे बघितल्यानंतर स्वतःची स्वतः लाज वाटू लागली आणि एकच वर्षात घरून येणारी मनी ऑर्डर परत केली व स्वबळावर शिक्षण घेण्याचे ठरवले, तांत्रिक ज्ञान व आवड असल्याकारणाने घड्याळ, टेप, टीव्ही, दुरुस्ती, असेंबलींग विक्री, फोटोग्राफी असे अनेक उद्योग शिक्षण घेत असताना केले व भरपूर पैसा मिळवला त्याचबरोबर बी.ए., एम.ए., बी.ड्रॉमा, एम. ड्रॉमा, एलएलबी एम.टी.ए, बी.जे, एम.जे, बीएड, एम.फिल, पी.एच. डी. सारख्या पदव्यांचे शिक्षण घेऊन पोलीस त्यानंतर जनसंचार मंत्रालयाचा सुपरवायझर या नोकऱ्या सोडून १९९७ ला सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद येथे प्राध्यापक म्हणून रुजू झाले संस्थाचालक दादासाहेब मस्के यांनी आपल्या पाल्याप्रमाणे प्रेम दिले संभाजीनगर ते जाफराबाद येत जात असताना राजुर दाभाडी तळेगाव या परिसरात उच्च शिक्षणाची सोय नव्हती बारावीनंतर मुलं मुली शिक्षणापासून वंचित राहत होते ही परिस्थिती बघून सन २००४ मध्ये दाभाडी येथे राजुरेश्वर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शासनाकडून मान्य करून घेतले व वंचित मुलांना उच्च शिक्षणाचे दार उघडे करून दिले, २००८ मध्ये दुसरे महाविद्यालय संभाजीनगर येथे मंजूर झाले आणि नोकरी करत असतानाच शिक्षण संस्था चालक झाले तसेच पीएचडी सारख्या सर्वोच्च पदवीचे ते प्रोफेसर गाईड झाले त्यांनी ८२ देशात व ९ परदेशात चर्चासत्र, परिषदांमध्ये सहभाग घेऊन ४८ शोधनिबंध सादर करून आंतरराष्ट्रीय मॅगेजीन्स मध्ये छापून आले आहेत त्याचबरोबर विद्यापीठाच्या प्रत्येक निवडणुकीत हीहिरीने भाग घेऊन सुरुवातीला कल्चरल सेक्रेटरी, अभ्यास मंडळ सदस्य, विद्या परिषद सदस्य (अकॅडमीक कौन्सिल मेंबर) परीक्षा गैरवर्तन समितीच्या न्यायाधीश या पदावर कार्य केले तसेच औरंगाबाद हिस्ट्री सोसायटीचे सचिव मराठवाडा इतिहास परिषदेचे सहसचिव नंतर उपाध्यक्ष या पदावर कार्यरत आहेत. सन २००० पासूनच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते ते सरचिटणीस या पदावर कार्य केले २०२२

मध्ये शिवसेनेत गद्दारी झाल्यानंतर एक आयकॉनिक मुख्यमंत्री उद्धव साहेब ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदावरून पायउतार व्हाव लागल हे बघून तळपायाची आग मस्तकात गेली आणि विचार राष्ट्रवादीच्या प्राथमिक सदस्य व प्रदेश सरचिटणीस पदाचा राजीनामा देऊन मातोश्रीवर उद्धव साहेब ठाकरे यांच्या हस्ते शिवबंधन बांधून त्यांच्या आदेशाने मेहकर लोणार विधानसभा क्षेत्रात शिवसेनेचे संघटन पुनर्बांधणीस तालुकाप्रमुख संदीप मापारी, नगरसेवक व शहर प्रमुख गजानन जाधव, तालुका उपप्रमुख परमेश्वर दहातोंडे, श्रीकांत नागरे, महिला तालुकाप्रमुख संजीवनी वाघ, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे, राजू बुधवत, युवा शहरप्रमुख श्रीकांत मादनकर, मेहकर चे तालुकाप्रमुख लिंबाजी पांडव, शहर प्रमुख किशोरभाऊ गारोळे, युवातालुकाप्रमुख आकाश घोडे, युवा शहरप्रमुख ऋषी जगताप, यांच्या सहकार्याने प्रारंभ केला सुरुवातीला लोक जवळ येण्यास घाबरत होते कारण शिंदेसोबत फुटलेले खासदार व आमदार त्याचं वास्तव्य येथेच आहे त्यांची भीती सर्वसामान्यांना वाटप होती याच दरम्यान चार वर्षापासून लोणचे धारतीर्थ तीर्थस्नाणासाठी पुरातत्त्व विभागाने बंद केले होते ते खुले करण्यासाठी उपोषण, सविनय कायदेभंग, आत्मदहनापर्यंतचे आंदोलन केले व धार तीर्थ खुले केले त्यानंतर सर्वसामान्यांचे शेतकऱ्यांचे, महिलांचे, बेरोजगारांचे प्रश्न घेऊन शासन प्रशासनाशी भांडू लागले, आमदार खासदारशी प्रत्यक्ष खेटू लागले, जनसामान्यांच्या मनातील भीती संपवण्यात त्यांना यश येऊन लोकसभा निवडणुकीत खासदारांच्या मूळ बालेकिल्ल्यात म्हणजेच मेहकर विधानसभा मतदारसंघात शिवसेना उबाठाणे विद्यमान खासदाराच्या बरोबरीची मते घेतली, शेतकरी, कष्टकरी, महिला, बेरोजगार व दिव्यांगांच्या न्याय्य हक्कासाठी ६३ आंदोलने करून त्यांना न्याय मिळवून देण्याचे मोलाचे कार्य डॉ. बछिरेंनी यांनी केले, त्याच बरोबर शिवसैनिकांचे ६ मेळावे, शिवसेना खासदार ओमराजे निंबाळकर, शिवसेना नेते मा. खासदार चंद्रकांत खैरे व शिवसेनेच्या फायर बँड नेत्या सुषमाताई अंधारे यांच्या ३ जाहीर सभा स्वबळावर घेऊन, उद्धव साहेबांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाज उपयोगी कार्यक्रम घेऊन दोन आडीच वर्षाच्या अत्यंत कमी कालावधी शिवसेनेचे एक दमदार नेतृत्व या मतदारसंघात डॉ. गोपाल बछिरेंच्या रूपाने उदयास आल, त्यांच्या कामाची पद्धत, त्यांचं संघटन कौशल्य बघून, जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, जिल्हा सहसंपर्कप्रमुख छगनदादा मेहत्रे व जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत यांनी जिल्हा संघटक या अत्यंत महत्त्वाच्या पदावर त्यांची नियुक्ती केली व ते संघटन बांधनिस मोठ्या जोमाने कामाला लागले बाळासाहेबांच्या शिकवणीनुसार गाव तिथे शाखा व घर तिथं शिवसैनिक निर्माण करण्याचं काम हाती घेऊन ते पूर्णत्वास नेलं आज मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघात, शिवसेना उ.बा.ठा. चे भावी आमदार म्हणून जनसामान्यांच्या जिभेवर डॉ. गोपाल बछिरे यांचे नाव आहे

फिरदोस खान, लोणार

# पदे रिक्त असल्याने कामे खोळंबली!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता या आठवड्यात लागण्याची शक्यता आहे मात्र ऐन निवडणुकी च्या तोंडावर जरंडी सज्जा साठी चक्क तलाठी व मंडळ अधिकारी हे पद रिक्त आहे गेल्या तीन महिन्यापासून जरंडी सज्जा व मंडळाला ही दोन कर्मचारी नाही त्यामुळे शेतकऱ्यांची कामे रेंगाळली आहे आचारसंहिता सुरू झाल्यावर नवीन अधिकारी नियुक्त करण्यात येत नाही त्यामुळे आगामी निवडणुक तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांविना होऊ घातल्या जाणार आहे

जरंडी हे महसूल मंडळ आहे या मंडळात सिल्लोड आणि कन्नड विधानसभा मतदार संघाचे असे १८ गावे समाविष्ट आहे परंतु या मंडळात तलाठी व मंडळ अधिकारी च नसल्याने जिल्हा प्रशासनाला चक्क या मंडळाचा विसर पडला आहे सध्या या भागात अतिवृष्टी चा पाऊस झाला आहे तलाठी व मंडळ अधिकारी विना या मंडळमधील बाधित क्षेत्राचे पंचनामे रखडली आहे दरम्यान आगामी आठवड्यात आचारसंहिता ची घोषणा झाल्यास नुकसानीचे पंचनामे ही होणार नाही शिवाय तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांवीणा या भागात निवडणुकीसाठी मतदान होईल ही गंभीर बाब आहे दरम्यान आचारसंहिता आधीच या मंडळात शेतकऱ्यांची कामे तुंबली आहे त्यामुळे अजुन च चिंता वाढली आहे याबाबत तहसीलदार मनीषा मेने जोगदंड यांचेशी संपर्क साधला असता जरंडी मंडळ व सज्जे साठी प्रभारी तलाठी व मंडळ अधिकारी यांची आदेश काढले असल्याचे त्यांनी सांगितले परंतु हे प्रभारी तलाठी व मंडळ अधिकारी कधीच मंडळ सज्जे वर फिरकले नाही

## पान एक वरून

**नाशिकमध्ये दोन**

अग्निवीरांच्या कुटुंबियांना निवृत्ती वेतन आणि अन्य सरकारी सुविधांचा लाभ का मिळणार नाही? जर दोन्ही सैनिकांच्या जबाबदाऱ्या आणि बलिदान समान आहे, तर ते शहीद झाल्यानंतर हा भेदभाव का?, असा प्रश्नही त्यांनी मोदी सरकारला विचारला आहे. तसेच अग्निपथ योजना ही लष्कराबरोबर अन्याय आणि आपल्या वीर जवानांच्या बलिदानाचा अपमान आहे. एका जवानाचे आयुष्य दुसऱ्या जवानापेक्षा अधिक मूल्यवान आहे का? याचं उत्तर पंतप्रधान आणि संरक्षण मंत्र्यांनी द्यायला हवं, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली.

**नाशिकमध्ये नेमकी काय घटना घडली?**

तोफखाना दलाचे देशातील प्रमुख प्रशिक्षण केंद्र देवळाली कॅम्प येथे आहे. या ठिकाणी दलात दाखल होणाऱ्या अग्निविरांसह जवानांना तोफखाना केंद्रात तर अधिकाऱ्यांना तोफखाना स्कूलमध्ये विविध अभ्यासक्रमांतर्गत प्रशिक्षण दिले जाते. देवळाली फिल्ड फायरिंग रेंज येथे गुरुवारी दुपारी तोफखान्याचा सराव सुरु असताना स्फोट झाला. गोहिल विश्वराज सिंग (२०) आणि सैफत शित (२१) हे दोन अग्निविरांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर आता चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

**भाजपचे संकटमोचक संकटात**

यापुर्वीच केसरकर यांच्याकडे संघर्ष समिती अध्यक्ष राजन आंदुर्लेकर व आजु अमरे यांच्या नेतृत्वाखाली भूमिपुत्रांनी भूमिका मांडली. मात्र भूमिपुत्रांना डावलून मंत्री गिरीश महाजन यांना आणून केसरकर भूमिपूजन समारंभ आज करण्यासाठी आले असताना त्यांची गाडी रोखली यावेळी सुमारे दोनशे आंदोलनकर्ते यांनी अचानकपणे गाडी रोखल्याने पोलिसांनी त्यांना पांगविण्यासाठी सौम लाठीमार केला. त्यामुळे काहींना दुखापती झाल्या त्यामुळे शिरोडा रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी माजी आमदार राजन तेली यांची रूग्णालयात जावून विचारपूस केली.वेळागर येथील भूमिपुत्रांनी दोन मंत्र्यांना रोखल्याने पोलिसांनी आंदोलकांवर लाठीमार केला दरम्यान पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी सर्व आंदोलकांची बाजू ऐकून घेतली. आपण सर्वे नंबर ३९ मधील २८.३० हेक्टर व दुसऱ्या सर्वे नंबर मधील २२ एकर जमीन वगळून प्रकल्प उभा करण्याचा निर्णय घेईन असे आश्वासन दिले. भाजपचे माजी आमदार राजन तेली यांनी आंदोलनकर्ते यांची भूमिका उचलून धरली.दरम्यान शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांनी आज ताज पंचतारांकित हॉटेल प्रकल्प भूमिपूजन तर फमेंटो पंचतारांकित हॉटेल प्रकल्प भूमिपूजन समारंभ आयोजित केला होता. पंचतारांकित हॉटेल प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्ह्यात निर्माण झाले तर पर्यटनास मोठा वाव मिळेल अशी त्यांची धारणा आहे.

**नाशिकमध्ये जरांगे-भुजबळांचे**

आली. त्यामुळे काही काळ तणावाचं निर्माण झालं.दरम्यान, या घटनेनंतर छगन भुजबळ यांच्या समर्थकांनी मनोज जरांगे यांचे पोस्टर फाडले असून शिविगाळ केली, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थकांनी माध्यमांशी बोलताना केला. तसेच छगन भुजबळ यांच्या समर्थकांवर कारवाई करावी, अशी मागणी करत त्यांनी शिवसृष्टी परिसरातच ठिय्या आंदोलन सुरु केली. याशिवाय काही मराठा कार्यकर्त्यांनी मनमाड-नगर महामार्गही रास्तारोको आंदोलन केलं. जोपर्यंत छगन भुजबळ यांच्या समर्थकांवर कारवाई होत नाही, तोपर्यंत आम्ही घरी जाणार नाही, अशी भूमिका या कार्यकर्त्यांनी घेतली.अखेर मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलकांची समजूत काढत शांतता राखण्याचं तसेच आंदोलन थांबवण्याचं आवाहन केलं. त्यानंतर मराठा आंदोलकांनीही मनोज जरांगे यांच्या विनंतीला मान देत आंदोलन थांबवण्याचा निर्णय घेतला.

**नारायण गडावर झळकले स्वागताचे**

सामाजिक कार्यात देखील त्यांचा सहभाग नेहमी असतो.राजकीय पलटावर त्यांची अभ्यासू व्यक्तीमत्व म्हणून ओळख असून तुफान क्रेझ आहे.शिरुर तालुक्यातील नारायणगड येथे शनिवार (दि.१२) ऑक्टोबर रोजी मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा, संपन्न झाला. या मेळाव्यात लाखो मराठ्यांशी मनोज जरांगे पाटील यांनी संवाद साधला. हा दसरा मेळावा तुफान गर्दीत यशस्वी होण्यासाठी प्रत्येक समाज बांधवांनी आपापल्या परीने प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत केली. येथे येणाऱ्या मराठा समाज बांधवांची गैरसोय होऊ नये यासाठी अहोरात्र झटले. जिल्ह्याच्या आणि राज्याच्या कानाकोपऱ्यातून मराठा बांधव लाखोच्या संख्येने नारायणगड येथे दाखल झाला होता. या नारायणगड परिसरात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या किसान आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष पूजाताई मोरे यांनी स्वागताचे होर्डिंग लावून मराठा समाज बांधवांचे स्वागत केले. धडाडीच्या कार्यकर्त्या म्हणून पूजाताई मोरे सर्वांना लोकपरिचीत आहेत. मराठा आरक्षणाचे आंदोलन सुरू झाल्यापासून त्यांचा आंदोलनात सक्रिय सहभाग राहिलेला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्या सतत मराठा समाज आरक्षण मुद्दा मांडत आलेल्या आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, विद्यार्थ्यांचे प्रश्न, कष्टकरी, गरीब, श्रमिकांचे प्रश्न, ठेविदारांचा प्रश्न, यावरती आवाज उठवण्याचे काम पूजाताई मोरे यांनी केले आहे. त्यांनी नारायण गड परिसरात लावलेले होल्डिंग एक सकारात्मक चर्चेचा विषय बनला असून समाजाप्रती असलेले दायित्व स्पष्टपणे दिसून येते. प्रत्येकाने आपआपल्या परीने नारायण गडावर येणाऱ्या मराठा बांधवांकरिता सुयोग्य सोय केली होती. आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो, त्यामुळे हजारो किमीचा प्रवास करून नारायण गडावर दाखल झालेल्या मराठा समाज बांधवांचे पूजाताई मोरे यांनी अनेक ठिकाणी होर्डिंग लावून स्वागत केले. त्यामुळे त्यांचे कौतुक होत आहे.

## पान सहा वरून

**अपूर्ण राहिलेले स्वप्न**

मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. यामुळे सध्या केज मतदारसंघात त्यांच्याच नावाची जोरदार चर्चा सुरू आहे त्यामुळे डॉ अंजलीताई घाडगे निवडणूक लढवुन जिंकल्या शिवाय व वडीलाचे स्वप्न पुर्ण केल्या शिवाय मागे हटणार नाही असे डॉ अंजलीताई घाडगे यांनी दैनिक पुण्यभूमीशी बोलताना म्हटले आहे.

**आंबेडकरी जनतेने आजच्या मोर्चात**

माझी विनंती आहे की आंबेडकरी समाजाच्या माय बहिणीवर वर व आंबेडकर समाजाच्या कार्यकर्त्यांवर लाठी चार्ज केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे पेड बीड पोलीस स्टेशनचे बंटेवाड यांना सेवेतून कायम डिसमिस केलं पाहिजे जातीय मानसिकतेतून त्यांनी रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नावाचा बोर्ड त्यांनी काढला आहे आणि विशेष म्हणजे हा बोर्ड त्यांनी रात्रीच्या आमदारांमध्ये काढला आहे त्यांना बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाची ऍलर्जी आहे का राजघटनेने सामान्य लोकांना जे अधिकार दिले आहेत ते अधिकार पोलीस प्रशासन सत्तेच्या जीवावर हिसकावून घेत आहे का लोकशाही मार्गाने लोकांच्या असलेल्या संस्थेला कोणाचे नाव द्यायचे आणि कोणाचे नाव नाही द्यायचे हे सामान्य जनतेला अधिकार आहेत लोक मागणी करू शकतात जनतेला अधिकार आहे या अगोदर सुद्धा या महाराष्ट्र मध्ये मराठवाडा युनिव्हर्सिटी ला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यायचं होतं यासाठी एक लढा उभा झाला आणि या लढ्यामध्ये अनेक भीम अनुयायांनी संघर्ष केला तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा बहुजनांचे नेते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार साहेबांनी सत्ता गेली तरी बेहतर मात्र मराठवाडा युनिव्हर्सिटी ला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेण्याचा निर्णय घेतला आणि त्या ठिकाणी औरंगाबाद येथे मराठवाडा युनिव्हर्सिटीचे नामांतर भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा यूनिवर्सिटी म्हणून झालं आज माझी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना विनंती आहे तुम्हाला जर जाती आणि धर्माचा अहंकार नाही तर तुम्ही बीड जिल्ह्यातील बीड रेल्वे स्टेशनला महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर नाव देऊन टाका अन्यथा तुम्हाला सत्तेवर राहण्याचा कोणताही अधिकार नाही सत्ताही सर्वसामान्यचे उपयोगाची असली पाहिजे २७ सर्व समाजाला घेऊन चालणारी असली पाहिजे या अगोदर या महाराष्ट्रात आणि या मराठवाड्यामध्ये अनेक महापुरुषांचे अनेक समाजसेवकांचे वेगवेगळ्या संस्थेला नाव देत असताना कधीही आंबेडकर समाजाने विरोध केला नाही तर प्रत्येकाच्या लढ्यामध्ये आंबेडकरी समाज हा सातत्याने उभा राहिला आहे त्यामुळे बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील माझ्या आंबेडकर समाजासह भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर प्रेम करणाऱ्या तमाम भीम आणि माझी विनंती आहे की बीड जिल्हा रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे नाव दिलं पाहिजे यासाठी आपण रस्त्यावर उतरून आंबेडकरी समाजाला सहकार्य करावे अन्यथा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे कार्यकर्ते बाबासाहेबांवर प्रेम करणारे कार्यकर्ते यांच्या मतापासून आपल्याला मुकावं लागेल बीड जिल्ह्यातील जो काही लोकप्रतिनिधी असेल आमदार असेल खासदार असेल मंत्री असतील किंवा अन्य कोणी असतील हे आमदार मंत्र्यांना सुद्धा माझी विनंती आहे की आपण लेखी स्वरूपाचे पत्र देऊन बीड जिल्हा रेल्वे स्टेशनला बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे अशी मागणी करा अन्यथा येणाऱ्या निवडणुकीमध्ये आंबेडकरी समाज हा तुमच्या सोबत नसेल बीड जिल्हा पोलीस एसपींना माझी विनंती आहे की आपण तात्काळ पेड बीड पोलीस निरीक्षक बंटीवार यांच्यावर निलंबनाची कारवाई करून समस्त आंबेडकरी समाजाची माफी मागावी अन्यथा आंबेडकरी समाज रस्त्यावर उतरल्यानंतर आंबेडकरी समाजाची ताकद तुमच्या लक्षात येईल असे प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात के के वडमारे यांनी म्हटले आहे.

**माध्यमांची मुंगी चावल्यास**

निधी शासनाने दिला. आगामी दोन चार दिवसांत आचार संहिता लागण्याचे संकेत आहेत त्यामुळेच तडकाफडकी कामांची उदघाटने उरकण्याचा घाट घातला जात आहे. असेच एक उदघाटन माळेवाडी या ठिकाणी पार पडले. एरव्ही प्रत्येकवेळी पत्रकारांची ऍलर्जी असलेल्या बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडेंच्या भागात हे काम होत असल्यामुळे अगदी लगबगीने फोन लावुन पत्रकारांनाही या कार्यक्रमासाठी निमंत्रीत करण्यात आले. मात्र जयदत्त नरवडेंना या उदघाटनाच्या कार्यक्रमात कुठला उत्साह होता हे कळुन आले नाही कारण नरवडे हे त्यांच्या प्रास्ताविकात चक्क पत्रकारांवरच घसरले आणि पत्रकारांकडे बघुन त्यांनी अत्यंत मिश्कीलपणे तुमची तर सगळीच व्यवस्था केली आहे असे म्हणुन पत्रकारांना खिजविण्याचा प्रकार केला. त्यावर कांही पत्रकार बांधवांनी लगेचच आक्षेप घेतला असता आपल्याकडुन चुक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले व त्यांनी जाहिररित्या माफी देखील मागीतली. मात्र कार्यक्रमाला बोलावुन वरुन अशा पध्दतीने वागविल्यामुळे पत्रकारांकडुन जयदत्त नरवडे हे मागील अनेक वर्षांपासुन बाजार समितीत उपसभापती व त्यानंतर आता सभापती म्हणुन मांडी आड करुन खंडी खात आहेत पण त्यांची गत डोळे बंद करुन दुध पिणा-या मांजरागत आहे त्या मांजराला वाटतं डोळे बंद केल्याने आपल्याकडे कुणी पाहात नाही. परंतु असे नसुन बाजार समितीत नरवडेंनी काय काय दिवे लावलेत आणि त्या दिव्यात तेल कुठुन कुठुन आलं हे सर्व माध्यमांना तर सोडाच सर्वसामान्यांनाही माहित आहे त्यामुळे असेच घसरत राहिलात तर माध्यमांची मुंगी तुमच्या कुठल्या भागाला चावेल आणि विविध ठिकाणच्या आपल्या कारभाराची लुंगी कशी फिटेल याची कल्पना सुध्दा तुम्हाला लागणार नाही. अशा प्रतिक्रिया बाजार समितीविषयीच्या जाणकारांमधुन येत आहेत. या बाबीचा जाहिर निषेध नोंदवला जात आहे. तर आ. सोळंकेंनी अशा बाडगुळ पिददुंना आवरावे अशी मागणी देखील पत्रकारांकडुन केल्या जात आहे. दरम्यान मांडीआड करुन तंगडी खाणा-या जयदत्त नरवडे यांना कायम पत्रकारांची ऍलर्जी राहिलेली आहे मात्र नक्कीच ६० कोटींच्या कामात चांगलाच मलिदा मिळणार असल्याने एव्हाणा मिळालेला असल्याने नरवडे कदाचित भारावले असावेत आणि त्यातुनच त्यांनी अशा प्रकारे खिजविण्याचा प्रकार केला असावा असे आता बोलल्या जात आहे.

**वैद्यनाथ मंदिराच्या शिखरावरच**

ट्रस्टने याप्रकरणी पोलीसांत धाव घेतली असुन अनाधिकृत प्रवेश,मंदिर तोडफोड व विद्रूपीकरण केले म्हणून दीपक देशमुख यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.मात्र अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

**रेल्वे नामकरण आंदोलनास**

कार्यकर्ते लोकशाही मार्गाने आंदोलन करत आहेत. माजी सैनिक अनुरथ वीर यांचे उपोषण चालू असून त्यांची प्रकृती गंभीर होऊ लागली आहे. निवृत्त माजी सैनिकाच्या तीव्र उपोषण आंदोलनाची प्रशासनाने दखल घेतली पाहिजे. अशी मागणी राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केली आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# आंदोलन करताच प्रशासन झाले जागे!

## दिलासा | कामगारांना दिवाळी सानुग्रह अनुदान मंजूर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हा बांधकाम कामगार संघटना लाल बावटा व इमारत व इतर बांधकाम कामगारांना फेडरेशन महाराष्ट्र राज्य सिटू लाल बावटा च्या वतीने सातत्याने गेली ३ तीन वर्षांपासून आंदोलन व मोर्चाच्या आणि पाठपुराव्याच्या माध्यमातून हि दिवाळी सानुग्रह अनुदानाची मागणी लावून धरलेली होती व यासाठी राज्य भरात दि.१० ऑक्टोबर २०२२ रोजी मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर ८ ऑगस्ट २०२३ रोजी या मागणीला घेऊन मोर्चा काढण्यात आला. व नंतर ११ सप्टेंबर २०२३ ला मंत्रालयात लाल बावटा बांधकाम कामगारा संघटनेच्या शिष्टमंडळा सोबत झालेल्या बैठकीत कामगारमंत्री यांनी तत्वतः मागणी मान्य केली पण तिची अंमलबजावणी केली नाही.त्यामुळे पुन्हा एकदा २०२४ ला लाल बावटा बांधकाम संघटनेच्या वतीने १२ ऑगस्ट २०२४ लाल साह्यक कामगार आयुक्त कार्यालय व सरकारी कामगार अधिकारी कार्यालयवर हाजोरोंच्या संख्येने मोर्चे काढले तरी या दिवाळी सानुग्रह अनुदानाची अंमलबजावणी केली नाही म्हणून

सांगली येथे कामगार मंत्री सुरेश भाऊ खाडे यांच्या निवासस्थावर २४ सप्टेंबर२०२४ रोजी बांधकाम कामगारांचा धडक मोर्चा धडकला या मोर्चात ३० हाजारा पेक्षा जास्त बांधकाम कामगार सहभागी झाले होते.व बीड जिल्ह्यातील बांधकाम कामगार सुद्धा हाजोरोंच्या संख्येने सहभागी झाले होते. व या मोर्चाच्या शिष्टमंडळा सोबत चर्चा करताना सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या व मंजूरही करण्यात आल्या आहेत.मंजूर करण्यात आलेल्या मागणी मध्ये दिवाळी सानुग्रह अनुदानाची मागणी अग्रभागी होती.या मागणीला १० ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत तीला मान्यता देण्यात आली. यांची अंमलबजावणी करण्यास कामगार मंत्री व इमारत व इतर बांधकाम कामगारांना कल्याणकारी मंडळाने सुरूवात केली आहे.यामुळे राज्यातील लाखो नोंदणीकृत बांधकाम कामगारांची दिवाळी गोड होणार आहे.या निर्णयाचा स्वागत लाल बावटा बांधकाम कामगार संघटना करते व हा निर्णय घेण्याल्यामुळे बांधकाम कामगारात उत्साहच वातावरण तयार झाले आहे. या लढ्यात सहभागी झालेल्या सर्व लढाऊ बांधकाम कामगारांच संघटना अभिनंदन करते. संघटनेने लढुन मिळवलेली हि बांधकाम कामगारांची मागणी आहे व ती मंजूर करण्यात आल्या बदल कामगारमंत्री व मंडळाचे धन्यवाद संघटना मानते .!

या सर्व लढ्याच आंदोलनाच नेतृत्व लाल बावटा बांधकाम कामगार संघटना सिटु व इमारत व इतर बांधकाम कामगारांना फेडरेशन महाराष्ट्र राज्य सिटू लाल बावटा यांनी केले. यात बांधकाम कामगाराचे नेते बीड जिल्हा बांधकाम कामगारांना संघटना लाल बावटा चे जिल्हा अध्यक्ष कॉ.प्रा.बी.जी.खाडे जिल्हा उपाध्यक्ष कॉ.ओम पुरी यांनी हि मागणी सातत्याने लावून धरली व यशस्वी करून दाखवी. प्रत्येक आंदोलनात सहभागी असलेले सहकारी जालिंदर गिरी, प्रकाश वाघमारे, ,श्री.ज्ञानेश्वर आजबे, भागवत झाटे,अन्सार शेख, जावेद शेख, नितीन भैरट,हारिदास गिरी, शेख नविन ,गणेश चौधरी, अर्जुन सोळंके, नावेद मौजवान इ कार्यकर्ते व हाजारो बांधकाम कामगारांना सहभागी होते.

# बलभीम नगर बुद्ध विहारात धम्मचक्र दिन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बलभीम नगर बुद्ध विहार शिवाजी नगर पालवन रोड बीड येथे १२ ऑक्टोबर २०२४ रोजी अशोक विजयादशमी व ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिना निमित्त ऍड तेजस वडमारे यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनाचा कार्यक्रम आयोजीत केला होता या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थीती म्हणून बीड नगर परिषदेचे नगरसेवक विनोदजी मुळूक हजर होते त्यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर तथागत गौतम बुद्ध यांना वंदन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून सामूहिक त्रिसरण पंचशील बुद्ध वंदना व डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दीलेल्या २२ प्रतिज्ञाचे सामुहिक पठण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाअभिवादन केले व बुद्ध आणि त्याचा धम्म ग्रंथ वाचच्या ८४ व्या दिवशी आयु. अंजली विशाल वडमारे हिने वाचन केले,

त्यावेळी बलभीम नगर मित्र नगर शिवाजीनगर परिसरातील सर्व बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांनी बुध्द आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनाचे श्रवण केले तेव्हा आयु.निवृती वाघमारे,नीतीन वाघमारे, अमर वडमारे, अंकुश जाधव,सिद्धार्थ वडमारे, आर्यन साळवे, जय जाधव, प्रेम जोगदंड, नागेश साळवे, अजय जाधव, सचिन खेमाडे आकाश वाघमारे, आयु. आशाबाई खेमाडे, स्वाती वडमारे, कोमल वाघमारे शकुंतला ससाने मॅडम, हौसाबाई वाघमारे सरिता खेमाडे, संघर्ष वाघमारे ऍड तेजस वडमारे व परिसरातील बौद्ध उपासक उपसिका बालक बालिका पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून बलभीम नगर बुद्ध विहार पलवन रोड, बीड येथे उपस्थित होते.

# राहुरीत धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात

## गायकवाड:शांतीचा मार्ग सांगणारा बोध्द धर्म

राहुरी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

नागपूर येथील दीक्षाभूमी येथे १४आव्टोबर १९५६ ला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बोध्द धम्माची दीक्षा घेतली काळासह पडघाआड चाललेल्या या धम्माचा बाबासाहेब आंबेडकरांनी पुन्हा प्रसार करण्यास सुरुवात केली केली होती त्यावेळी त्यांच्यासह लाखो नागरिकांनी या धम्माचा स्वीकार केला बाबासाहेबांनी मी हिंदू म्हणून जन्माला आलो पण मी हिंदू म्हणून मरणार नाही असं म्हणत शांतीचा मार्ग सांगणारा बौद्ध धर्म स्वीकारला असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक शिरीष गायकवाड यांनी केले

राहुरी येथे धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्या वेळेस ते बोलत होते ते पुढे म्हणाले की हा धर्मांतर सोहळा अशोका विजयादशमीला साजरा केला जातो १४ ऑक्टोबर रोजी दीक्षाभूमी नागपूर येथे लाखोच्या संख्येने बुद्धाने जमतात व भारतभूमीत जवळपास लुप्त झाल्या बौद्ध धर्माचे चक्र डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी गतिमान म्हणजेच धम्मचक्र प्रवर्तन केले म्हणून या दिवसाला धम्मचक्र प्रवर्तन दिन असे म्हणतात. या वेळी दै पुण्यभूमी व प्रबुद्ध भारत चे जिल्हा प्रतिनिधी अप्पासाहेब मकासरे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष निलेश शिरसाठ दादु भाऊ साळवे किरण साळवे दिपक साळवे अजय साळवे भुषण साळवे रोहीत तेलतुंबडे अक्षय लोंढे नितीन साळवे बचुटे सर कुष्णा मोरे सुजित साळवे आदित्य साळवे विवेक सगळगिळे आदी उपस्थित होते.

# कड्यात आज 'आईचा जागर' कार्यक्रम

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील नवरात्री निमित प्रसिद्ध गायिका गायत्री शेलार यांच्या 'आईचा जागर' या कार्यक्रमाचे आज सोमवारी सायंकाळी सात ते दहा या वेळेत सुंदरनगरमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

कडा येथील जय मातादी नवरात्रोत्सव मंडळ आयोजित सोमवार दि. १४ ऑक्टोबर रोजी आईचा जागर या देवी गीत आणि भक्ती संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे . प्रसिद्ध गायिका गायत्री शेलार आणि त्यांचे सहकारी विविध गाणी सादर करणार आहेत . सायंकाळी सात ते दहा या वेळेत कडा येथील सुंदर नगर परिसरातील दत्त मंदिर या ठिकाणी हा कार्यक्रम होणार असून यासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने हजर राहण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# बीडमध्ये वंचितची महत्वपूर्ण बैठक!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे बीड तालुक्यातील आजी माजी सर्व पदाधिकारी व बूथ प्रमुख कार्यकर्ते यांचे संवाद बैठक कार्यकर्ता मेळावा दि. १३ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथे संवाद बैठक संपन्न झाला.

वंचित बहुजन आघाडी बीड तालुक्याची बैठक शासकीय विश्रामगृह बीड या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती सदरील बैठक तालुका निरीक्षक भारत अण्णा तांगडे, सुभान भाई, अंकुश जाधव यांनी संयुक्तरीत्या आयोजित केली होती. सदर बैठकीचे नियोजन वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष किरण वाघमारे व शहराध्यक्ष लखन जोगदंड यांनी केले होते यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, महासचिव खंडू जाधव, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर कवठेकर, सचिन मेघडंबर, भीमराव अवसरमल, पुरुषोत्तम उर्फ गोटू वीर, ज्येष्ठ नेते सल्लागार बबन वडमारे,महिला जिल्हाध्यक्ष अनिताताई चक्रे, महिला महासचिव कल्पना गोरे, महिला उपाध्यक्ष पुष्पाताई तूरूकमाने, सदस्य शेषेराव घुगे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख राजेश कुमार जोगदंड मिलिंद सरपते यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.सदरच्या बैठकीमध्ये विधानसभा निवडणूक पक्ष संघटन बांधणी या विषयावर अजय सरवदे यांनी मार्गदर्शन केले. लोकसभा निवडणुकीच्या नंतर वंचित बहुजन आघाडी हे क्शन मोडवर आलेली आहे तरी वंचित बहुजन आघाडी विधानसभेमध्ये आपल्या उमेदवार कसे निवडून येतील यासाठी पूर्ण तयारी करत आहेत प्रत्येक तालुक्यामध्ये बूथबांधनी सवांद दौरा प्रत्येक तालुक्यामध्ये घेतले जात आहे आदरणीय बाळासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या आदेशानुसार बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे पूर्ण जिल्हा पिंजून काढून प्रत्येक तालुक्यामध्ये संवाद दौरा राबवण्याचे काम करत आहेत तरी त्यांनी बीड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांमधील वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निवडून आल्याशिवाय राहणार नाही असे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी म्हटले आहे.

# परळीत आरएसएसचे पथसंचलन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने परळी वैजनाथ येथे आज विजयादशमी पथसंचलन करण्यात आले. या पथसंचालनात मोठ्या संख्येने संघ स्वयंसेवक व नागरिक सहभागी झाले होते.

कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयापासून या पथसंचलनाला प्रारंभ झाला. महिला कॉलेज– राणी लक्ष्मीबाई टावर– स्टेशन रोड– डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी रेल्वे उड्डाणपूल मार्गे हे पथसंचलन शहराच्या प्रमुख मार्गावरून करण्यात आले. यावेळी संघ शिस्तीमध्ये आणि वाद्यवृंदांच्या सहभागाने हे पथसंचलन करण्यात आले. या पथसंचलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले. ठिकठिकाणी या पथसंचलनावर पुष्पवृष्टीही करण्यात आली.

# नाकरिकांच्या सुखदु:खात आपण सोबत

## राजेभाऊ फड: पौळ,गडदे कुटुंबीयांचे सांत्वन

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती प्रभाकरराव पौळ तसेच पंचायत समितीचे माजी उपसभापती बळीराम गडदे यांच्या मातोश्रींचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी पौळ आणि गडदे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. याप्रसंगी बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचीही उपस्थिती होती.

बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी रविवारी परळी विधानसभा मतदारसंघातील

अनेक कुटुंबियांच्या सांत्वनपर भेटी घेतल्या. परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती प्रभाकरराव पौळ तसेच पंचायत समितीचे माजी उपसभापती बळीराम गडदे यांच्या मातोश्रींचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. त्यांच्या दु:खात सहभागी होत पौळ आणि गडदे कुटुंबीयांना धीर देऊन त्यांचे सांत्वन केले व कुटुंबीयांची विचारपूस केली. याप्रसंगी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष एच. यु.फड यांच्यासह अनेकजण सोबत होते.

# अतिक्रमण हटवून स्मारक उभा करावे!

## मिलिंद घाडगे: बौद्ध समाजाची लवकरच व्यापक बैठक

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी शहरातील संत चोखामेळा ट्रस्टच्या जागेत अनेकांनी अतिक्रमण केले असून या जागेवरील अतिक्रमण हटवून त्या जागी भव्य स्मारक व सभागृह बांधण्याच्या संदर्भात विचार विनिमय करण्यासाठी बौद्ध समाजाची लवकरच व्यापक बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, संत चोखामेळा हे वारकरी संप्रदायातील महान असे संत होते. वारकरी संप्रदायामध्ये संत चोखामेळा यांचे नाव आजही अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांनी आपल्या गाथा आणि साहित्यातून मानवी मूल्यांचे आणि समानतेचे पेरणी केलेली आहे. याबरोबर तत्कालीन जातीभेदावर प्रहार केलेला होता. वारकरी संप्रदाय हा तथागत गौतम बुद्धांच्या बौद्ध धम्माचा समतावादी विचार प्रवाह पुढे नेणारा संप्रदाय आहे. शहरातील भूमी अभिलेख कार्यालयात मालकी हक्काच्या जागे संदर्भात अशा प्रकारचे नोंदही आहे.चोखामेळा ट्रस्टचे पुनर्जीवन करणे तसेच अतिक्रमण काढून त्या जागेवर भव्य असे चोखामेळा यांचे स्मारक आणि सभागृह बांधून ते बहुजन समाजासाठी उपयोगात आणता येईल या उद्देशाने समाजाचे बैठक घेऊन त्यावर पुढे निर्णय घेण्यात येईल असेही मिलिंद घाडगे यांनी म्हटले आहे.

## निर्णय | प्रवाशांच्या अडचणीवर काढला तोडगा

# लालपरीचे धोरण प्रवाशांच्या हिताचे!

लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

एसटीच्या प्रवासात प्रवाशांना काही अडचण निर्माण झाल्यास त्यांनी ती तक्रार अथवा समस्या थेट आगारप्रमुखांना फोन करून निवारण करून घ्या, असे आवाहन एसटी महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. त्यामुळे प्रवाशांच्या अडचणीचे निराकरण करणे सोपे होणार आहे. त्यासाठी आगारप्रमुखांसह इतर महत्वाचे दूरध्वनी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

एसटी प्रवासात चालक अतिवेगाने गाडी चालवत आहे, चालक गाडी चालवताना मोबाईलवर बोलत आहे, वाहक उध्दट वर्तन करत आहे, योग्य त्या ठिकाणी उतरवले जात नाही, अशा अनेक समस्यांचा यामुळे तोडगा निघणार आहे. यापूर्वी अशी यंत्रणा नव्हती. मात्र, महामंडळाने आता संबंधित आगार व स्थानकाचा क्रमांक प्रसिध्द करून प्रवाशांना दिलासा दिला आहे. यामुळे प्रवासादरम्यान प्रवाशांना अडचण अथवा समस्या निर्माण झाली तर त्या समस्या व

### तक्रारीचे तातडीने निराकरण होणार आहे

एसटी महामंडळाच्या नव्या निर्णयानुसार आता बसमधील चालक सीटच्या पाठीमागील जागेवर जिथं काही सूचना लिहिलेल्या असतात, आता तिथं संबंधित बसच्या आगारप्रमुखांचा मोबाइल नंबर देण्यात येईल. त्यामुळे प्रवाशांना प्रवासात काही अडचण आल्यास थेट आगारप्रमुखांशी संवाद साधता येणार आहे.

# केज तालुक्यात अवैध धंदे तेजीत

## सवाल:पोलिसांचे होतेय अक्षम्य दुर्लक्ष

केज/ पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यात पंकज कुमावत साहेब यांनी अवैध धंद्यावाल्यावर जरब बसवली होती अवैध धंदे बंद केले होते परंतु तेच अवैध धंद्या वाल्यांनी तालुक्यात जोर वाढलाय असे चर्चा सत्र केज तालुक्यात नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे. कारण पंकज कुमावत साहेब म्हटले की अवैध धंद्यावाल्यांना घाम फुटायचा पंकज कुमावत साहेब यांची कर्तबगारी धडाकेबाज होती परंतु आज काल पहायला गेलो तर पंकज कुमावत साहेब यांनी केज तालुका सोडल्या पासुन काही अवैध धंदे खुलेआम सुरू होऊ लागले आहेत जर अवैध धंदे खुलेआम सुरू झाले तर पंकज कुमावत केलेल्या कर्तबगारीवर



पानी फिरणार का असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.का अवैध धंदे खुलेआम सुरू होनार असा ही प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे का कमलेश मीना साहेब पंकज कुमावत यांच्या सारखी धडाकेबाज कर्तबगारी कामगिरी करणारा असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे .का अवैध धंदे चालकांशी असलेले आर्थिक संबंध बळकट होनार का असा ही प्रश्न नागरिकांना पडला आहे तसेच पंकज कुमावत साहेब गेल्या पासून अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी केजचे पोलिस निरीक्षक कुठलाही ठोस निर्णय घेताना दिसत नाहीत तरी पंकज कुमावत साहेब यांनी अवैध धंद्यावर घातलेली जरब धडाकेबाज कर्तबगारी केजचे डीवायएसपी कमलेश मीना साहेब दाखवणार का असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

# सरकारकडून कृषी खाते वाऱ्यावर

## कृषी आयुक्तालयातील ५८ टक्के पदे रिक्त
## १० हजार जागा भरल्याच नाहीत

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई** : कृषी आयुक्तालयातील ५८ टक्के तर राज्यातील कृषी विभागातील ३६ टक्के जागा रिक्त आहेत. त्यामुळे कृषीविभागातील कामांचा बोजवारा वाजला आहे. तर कृषी पदवीधर नोकरीच्या अपेक्षेने सरकारच्या जागा भरण्याच्या निणर्याची प्रतीक्षा करत आहेत.

कृषी विभागातून मिळालेल्या १ सप्टेंबरपर्यंतच्या माहितीनुसार, कृषी आयुक्तालयातील मंजूर असलेल्या ८३१ पदांपैकी केवळ ३५२ पदे भरली असून ४७९ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची ही टक्केवारी ५८ टक्के एवढी आहे. यामध्ये गट-अ मधील मंजूर ५७ जागांपैकी ३५ जागा भरलेल्या असून २२ जागा रिक्त आहेत. गट ब च्या ११४ जागांपैकी ७८ जागा भरलेल्या असून ३६ जागा रिक्त आहेत. गट क मधील ५३६ जागांपैकी २११ जागा भरलेल्या असून ३२५ जागा रिक्त आहेत. तर ड गटामधील १२४ जागांपैकी २८ जागा भरलेल्या असून ९६ जागा रिक्त आहेत.

दरम्यान, राज्यभरातील कृषी विभागाच्या सर्वच पदाचा विचार केला तर आयुक्तांपासून ड वर्गापर्यंत एकूण ३६ पदे आहेत. राज्यभरातील कृषी विभागात काम करण्यासाठी एकूण २७ हजार ५०२ पदे मंजूर आहेत. पण त्यातील केवळ १७ हजार ५०० जागा भरलेल्या असून १० हजार २ जागा रिक्त आहेत. एकूण पदांपैकी रिक्त जागांची टक्केवारी ही ३६ टक्के एवढी आहे.

### शेतकऱ्यांचे प्रश्न वाऱ्यावर सोडले

रिक्त जागांमुळे अतिरिक्त परभार अधिकाऱ्यांना देण्यात येतो. या कामाचा अतिरिक्त ताण अधिकाऱ्यांवर पडल्यामुळे कामाची गती मंदावते. राज्याचे कृषी क्षेत्र देशावर प्रभाव टाकत असले तरीही कृषी विभागाची ही स्थिती आहे. राज्य सरकारकडून निवडणुकीच्या तोंडावर प्रलंबित पीक विमा, अनुदानाची रक्कम, योजनेची उर्वरित रक्कम तातडीने मंजूर करण्यात आली. पण रिक्त पदांमुळे राज्य सरकारने शेतकरी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न वाऱ्यावर सोडले आहेत का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# ग्रामीण भागातही म्हाडाची योजना राबवणार

### आढळराव पाटलांची माहिती, ६ हजार २९४ घरांची लॉटरी

**पुणे**: म्हाडाकडून यापुढे ग्रामीण भागातील नागरिकांसाठी गृहनिर्माण योजना राबविण्याचे नियोजन सुरू आहे. या संदर्भात सर्व नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांची बैठक घेऊन कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती पुणे म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी दिली.

मंचर, शिरूर, खराबवाडी, आळंदी येथे काही जागा उपलब्ध झाली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. म्हाडातर्फे दसऱ्याच्या मुहूर्तावर ६ हजार २९४ घरांच्या सोडतीचा प्रारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी म्हाडाचे मुख्याधिकारी राहुल साकोरे उपस्थित होते. ते म्हणाले, 'पुणे पिंपरी महापालिका तसेच पीएमआरडीए क्षेत्रातही या सोडतीमध्ये मोठ्या प्रमाणावर घरे उपलब्ध झाली आहेत. ग्रामीण भागातूनही अशा पद्धतीची मागणी होत असल्याने मोठ्या नगरपालिका तसेच नगरपरिषदांच्या कार्यक्षेत्रात मोकळी जागा शोधण्याचे काम सुरू आहे. त्यानुसार मंचर व शिरूरमध्ये प्रत्येकी चार एकर, चाकण जवळील खराबवाडी येथे अडीच एकर आळंदी येथे पाच एकर जागा शोधली असून या संदर्भातील प्रस्ताव म्हाडाच्या मुख्य कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. पुणे आणि पिंपरीतील म्हाडाच्या जुन्या वसाहतींमधील घरे मोडकळीस आली असून या इमारतींच्या पुनर्विकास संदर्भातील प्रस्तावही तयार करण्याचे काम सुरू आहे. या संदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली आहे.

# बदनाम केलेली राज्य सहकारी बँक नफ्यात

### अजित पवार यांचा विरोधकांना टोला

देशोन्नती वृत्तसंकलन

**कोल्हापूर** : राजकीय द्वेषातून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला बदनाम केले, पण तीच बँक ६५० कोटींच्या नफ्यात आल्याचा टोला विरोधकांना लगावत, या प्रवृत्तीमुळे सामान्य माणसाचे नुकसान झाल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

कोल्हापूर जिल्हा सहकारी बँकेच्या ई लॉबी व नूतन इमारतीचे उद्घाटन बुधवारी उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष व वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ होते. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, ग्रामीण अर्थव्यवस्था भक्कम करण्याचे काम विकास संस्था, जिल्हा बँक व राज्य सहकारी बँक या त्रिस्तरीय यंत्रणेने केले. पण, राजकारणातून राज्य बँकेला बदनाम करण्याचे काम केल्याने त्याचा फटका सगळ्यांनाच बसला.

# अभिनेते सयाजी शिंदे यांचा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

मुंबई : विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडींना वेग आला आहे. पुढील काही दिवसांमध्ये निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच पक्षांचे नेते जोरदार कामाला लागले आहेत. अनेक नेत्यांकडून मतदारसंघात मोर्चेबांधणी सुरु असून सभा, मेळावे घेण्यात येत आहेत. यातच ऐन निवडणुकीच्या तोंडावर अनेक नेते, एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही पाहायला मिळत आहे. असे असतानाच आता अभिनेते सयाजी शिंदे यांनी आज (११ ऑक्टोबर) राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश केला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची आज मुंबईत पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत अभिनेते सयाजी शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

### ना.छगन भुजबळ यांनी केले सयाजी शिंदेंचे कौतुक

अभिनेते सयाजी शिंदे यांनी हिंदी, मराठी तेलगू आणि तमिळ चित्रपटांमध्ये काम केलेले आहे. तसेच ते गेल्या काही वर्षांपासून सामाजिक क्षेत्रातही कार्यरत होते. सयाजी शिंदे यांनी लाखो झाडे लावत सह्याद्री देवराई उभे केलेले आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची राज्यभरात चर्चाही झाली. मात्र, सामाजिक कार्यानंतर आता सयाजी शिंदे यांनी राजकारणात प्रवेश करत अजित पवारांच्या उपस्थितीत घड्याळ हाती बांधले आहे. या पक्ष प्रवेशावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी अभिनेते सयाजी शिंदे यांचे कौतुक केले. भुजबळ म्हणाले, ठआता उद्या दसरा आहे. पण आम्हाला आजच दसरा साजरा करण्याचे भाग्य लाभले. खरे तर महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर सयाजी शिंदे यांनी आपल्या कामाने मोठा ठसा उमटवला आहे. त्यांनी मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य अशा विविध भाषेच्या चित्रपटांमध्ये अभिनय केला. ते अभिनेते आहेतच, पण आता ते नेते देखील झाले आहेत. सयाजी शिंदे यांनी सामाजिक क्षेत्रात मोठे काम केले आहे.

# चोराला पकडले पण काळाने गाठले

### पाठलाग करताना हृदयविकाराने तरुणाचा मृत्यू

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे** : पौड (ता.मुळशी) येथील विठ्ठलवाडी फाटा (ओंबळेवाडा) येथे चोरीच्या उद्देशाने घरात घुसलेल्या चोराला पाठलाग करून पकडले. मात्र, चोराचा पाठलाग करताना हृदयविकारामुळे एका युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अक्षय अंकुश ओंबळे (२७) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, विठ्ठलवाडी फाटा येथे राजेंद्र ओंबळे हे मंगळवारी रात्री झोपलेले असताना त्यांना घराच्या मागील बाजूच्या दरवाजातून कोणीतरी आत आल्याचा आवाज आला. ओंबळे यांनी आजूबाजूला राहणाऱ्यांना या घटनेची माहिती फोनवरून दिली. नंतर या सर्व जणांनी या चोरी करणाऱ्याला गाठले. यातील तीनजण एका दिशेला पळून गेले तर एक शरद काळे दुसऱ्या बाजूला पळाला. दुसऱ्या बाजूला पळालेल्या शरद याचा नागरिकांनी पाठलाग केला असता तो नागरिकांना सापडला. यावेळी चिडलेल्या नागरिकांनी त्याला लाथा व बुक्क्याचा प्रसाद देत पोलिसांच्या स्वाधीन केले. दरम्यान, शरद काळे याचा पाठलाग करणाऱ्यांमध्ये अक्षय ओंबळे याचाही समावेश होता. दगदग आणि दमछाक झाल्यामुळे अक्षयला अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर त्याला पुण्यातील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले.

**मुंबई** : रेल्वेमार्गालगतच्या काही गृहनिर्माण संस्था त्यांच्या आवारातील पाणी उपसून रेल्वे रुळांमध्ये सोडतात. त्यामुळे अशा सोसायट्यांना कडक समज द्यावी. या सोसायट्यांनी एकदा सांगूनही न ऐकल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशा सूचना पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिल्या आहेत.

# मानसिक आजारांचे प्रमाण वाढतेय; तरुणाईमध्ये प्रमाण अधिक

### ताणतणाव, चिडचिडेपणा, नैराश्याने अनेकजण ग्रस्त

**पुणे** : विविध ताणतणाव आणि वाढत चाललेली स्पर्धा यामुळे प्रत्येक व्यक्तीला मानसिक ताणतणाव, नैराश्य आणि चिडचिडेपणाला सामोरे जावे लागत आहे. परिणामी मानसिक आजारांचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यात प्रामुख्याने प्रत्येक दहा व्यक्तींमागे दोन व्यक्ती मानसिक आजाराची शिकार होत आहेत. तरुणांमध्येही मानसिक आजाराचे प्रमाण वाढत असून, २०३० पर्यंत नैराश्यामुळे मोठ्या प्रमाणात मानसिक दुबळेपणा वाढण्याचा धोका असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासातून निदर्शनास आले आहे.

शारीरिक आरोग्याइतकेच आज मानसिक आरोग्य सांभाळणे खूप आवश्यक आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अभ्यासानुसार, राज्यात १४.३ टक्के म्हणजे २.६ कोटी प्रौढ लोक मानसिक आरोग्याशी झगडत असून, प्रत्येकी १० व्यक्तींपैकी किमान दोन व्यक्तींना मानसिक आजाराची लक्षणे दिसून येत आहेत. कुणाला सर्दी, ताप खोकला किंवा पोटदुखी झाल्यास मागचा पुढचा विचार न करता डॉक्टरांकडे धाव घेतो. पण मानसिक आजाराचे काय? त्याकडे दुर्लक्ष करतो.

**काय म्हणते राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षण**

- राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षण २०१९ नुसार, देशातील १४ टक्के प्रौढ व्यक्तींमध्ये मानसिक आजाराची लक्षणे आहेत. सुमारे ५.६ कोटी लोक नैराश्याने आणि ३.८० कोटी लोक चिंतेने ग्रस्त आहेत. जागतिक स्तरावर आणि देशात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. महाराष्ट्रही त्याला अपवाद ठरलेला नाही. मानसिक आजार योग्यवेळी निदान झाल्यास आजार बरे होण्याची शक्यता असते. पण पुरेशा मानसोपचार तज्ज्ञांच्या अभावी १५ कोटी मानसिक आजारी लोकांपैकी फक्त २५ टक्केच लोकांना उपचार मिळत असल्याचे राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षणातून समोर आले आहे.

# राज्यातील 140 सहकारी सूतगिरण्यांना 2046.67 कोटींची मदत

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई** : महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कापूस उत्पादन करण्यात येते. परिणामी महाराष्ट्रात सूतगिरण्यांची संख्या जास्त आहे. पूर्वीपासूनच महाराष्ट्रात सूतगिरण्यांचा उद्योग राज्याच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावतो आहे. सूतगिरण्यांचे, सहकारी व खाजगी सूतगिरणी असे वर्गीकरण होते. सहकारी सूतगिरण्यांची मालकी विभागलेली असते तर खाजगी सूतगिरण्यांची मालकी वैयक्तिक असते. सहकारी सूतगिरण्यांना महाराष्ट्राच्या ग्रामीण औद्योगिकीकरणात महत्त्वाचे स्थान आहे. रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून राज्याच्या आर्थिक विकासात सूतगिरण्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे.

आजपर्यंत राज्य सरकारने १४० सहकारी सूतगिरण्यांना शासकीय भागभांडवलातून २०४६.६७ कोटी रुपयांची मदत केली आहे. राज्य शासनाच्या एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३ -२०२८ मधून सहकारी व खाजगी सूतगिरण्यांची प्रगती व्हावी, तसेच राज्यातील विविध सहकारी उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना जाहीर केल्या आहेत.

**राज्यातील खासगी आणि सहकारी सूतगिरण्या**

खासगी व सहकारी सूतगिरण्या ४ झोनमध्ये विभागल्या आहेत. प्रत्येक झोनमधील जिल्हे शासनाने ठरवून दिले आहेत. प्रत्येक सूत गिरणीला आपल्या झोननुसार आर्थिक मदत मिळते. पहिल्या झोनमध्ये अकोला, अमरावती, बुलढाणा, नागपूर, वर्धा, भंडारा इ. जिल्ह्यांचा समावेश होतो.

दुसऱ्या झोनमध्ये मध्यमहाराष्ट्रातील जालना, लातूर, बीड, हिंगोली, परभणी हे आणि अजून काही जिल्हे येतात.

# वन्यजीव तस्करीचे रॅकेट

### कफ परेड पोलिसांकडून चौघांना अटक

देशोन्नती वृत्तसंकलन

**मुंबई** : मांडूळ सापाची विक्रीचे रॅकेट उद्ध्वस्त करत कफ परेड पोलिसांनी चौघांना बेड्या ठोकल्या आहेत. दक्षिण मुंबईतील मेकर टॉवरजवळ ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी आरोपींकडून मांडूळ साप हस्तगत केला आहे. औषधे बनवण्यासाठी आणि काळ्या जादूसाठी या सापाची तस्करी केली जाते.

मारुती इर्टिगा कारमधून काही लोक मांडूळ सापाची विक्री करण्यासाठी येत असल्याची गुप्त माहिती कफ परेड पोलिसांना मिळाली होती. वरिष्ठ निरीक्षक संदीप विश्वासराव यांनी निरीक्षक देवकर आणि उपनिरीक्षक भागवत यांच्या नेतृत्वाखाली पथक तैनात केले. पोलिसांनी सापळा रचत आरोपींच्या मुसक्या आवळल्या. ठरलेल्या वेळी चार संशयित मारुती कारने आले. त्यांच्या संशयास्पद वागणुकीमुळे पोलिसांनी कारची झडती घेतली.

# नऊ वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार

### संशयित आरोपीस अटक

देशोन्नती वृत्तसंकलन

**सांगली** : अल्पवयीन मुलीवरील अत्याचाराच्या घटनेने सांगली परिसर पुन्हा एकदा हादरल्याचे दिसले. संजयनगर परिसरात नऊ वर्षाच्या चिमुरडीवर मंगळवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमाराला अत्याचार झाला. याप्रकरणी संशयित आरोपी ईश्वर महादेव कांबळे (२६) याला संजयनगर पोलिसांनी तातडीने अटक केली.

आज, बुधवारी हा प्रकार समजताच संतप्त नागरिकांनी रास्ता रोको करून निदर्शने केली. आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी केली. ज्या परिसरात हा प्रकार घडला त्या बंद स्वच्छतागृहाजवळील दारू व गांजा अड्डा उद्ध्वस्त केला. नऊ वर्षाच्या एका चिमुकलीला मोबाईल दाखवतो म्हणून ईश्वर कांबळे याने तिला तेथे आणले.

### अल्पवयीन मुलांना मद्य देणारे रडारवर

**मुंबई** : पुण्यातील पोर्शे अपघात प्रकरणानंतर मुंबईत ठिकठिकाणी नाकाबंदी करत ड्रंक अँड ड्राइव्हविरोधात मुंबई पोलिसांनी कारवाईचा वेग वाढवला. बार, पबची तपासणी करत मुंबईत विशेष मोहिमेअंतर्गत शहरात सर्वत्र गस्त घालण्यात आली.

### पतीच्या निधनानंतर सौभाग्यालंकार न उतरवण्याचा निर्णय

**बिळाशी / सांगली** : बिळाशी (ता. शिराळा) येथील डॉ. दत्तात्रय नरसू परीट यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी नुकतेच निधन झाले. त्यांची पत्नी मालन दत्तात्रय परीट यांचे सौभाग्य अलंकार न उतरण्याचा व त्यांची रक्षा नदीत विसर्जित न करता त्यांनीच लावलेल्या झाडाला घालून परीट कुटुंबियांनी क्रांतिकारी निर्णय घेतला. याबाबतची माहिती अशी, बिळाशी येथील अण्णा परीट यांचे धाकटे बंधूचे नुकतेच निधन झाले. त्यांचा मुलगा सतीश परीट मुलगी नंदा व राधिका पुतणे ग्रामीण कथाकार बाबासाहेब परीट, दीपक परीट, चंपा व वनिता यांनी रक्षाविसर्जनाच्या दिवशी उतरवले जाणारे सर्व अलंकार जसेच्या तसे ठेवण्याचा निर्णय घेतला.

### दारूच्या नशेत गाडी चालविणाऱ्या ६,९१७ जणांवर कारवाई

**मुंबई** : दारूच्या नशेत भरधाव वेगाने गाडी चालवणाऱ्या चालकांची वाहतूक पोलिसांनी चांगलीच झिंग उतरवली आहे. यावर्षी पहिल्या ९ महिन्यांत ६ हजार ९१७ जणांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी सहा पटीने या कारवाईत वाढ झाली आहे. वाहतूक पोलिसांनी गेल्या नऊ महिन्यांत रस्त्यावर दारूच्या नशेत वाहन चालवून स्वतःसह दुसऱ्यांचा जीव धोक्यात घालणाऱ्यांविरोधात धडक कारवाई केली.

**सातारा** : पुनर्रचित हवामान आधारित 'फळ पीकविमा योजना' आंबिया बहार सन २०२४-२५ मध्ये डाळिंब, संत्रा, मोसंबी, काजू, केळी, द्राक्ष, आंबा, पपई व स्ट्रॉबेरी या ९ फळ पिकांसाठी ३० जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.

# दिल्लीतला शाहू पुतळा बदलायचे काय झाले?

### अजितदादा आश्वासन पाळणार की नाही?

देशोन्नती वृत्तसंकलन

**कोल्हापूर** : दिल्लीतील महाराष्ट्र सदनामधील शाहू महाराजांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी विसंगत पुतळा बदलू, अशी विधानसभा अधिवेशनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ग्वाही दिली होती. परंतु या ग्वाहीनंतर काहीही पुढे झाले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अधिवेशनातील आश्वासन तरी उपमुख्यमंत्री पाळणार की नाही, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे. या प्रश्नावर ५ जुलै रोजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित केला होता.

# चोरांचा कांद्यावर डोळा

### साडे पाच लाखांचा कांदा ट्रॅक्टरसह पळवला

देशोन्नती वृत्तसंकलन

**नाशिक** : एकीकडे कांद्याला समाधानकारक दर मिळत असताना नाशिकच्या देवळ्यातून अजब प्रकार समोर आला आहे. सरस्वतीवाडी येथील शेतकरी विजय झिपरू आहेर यांच्या मालकीचा कांदे भरलेल्या ट्रॉलीसह ट्रॅक्टर अज्ञात चोरट्यांनी पहाटेच्या सुमारास चोरून नेल्याची घटना घडली आहे.

यासंदर्भात देवळा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

देवळा रस्त्यावरील सरस्वतीवाडी (आहेर वस्ती) शिवार येथील प्रगतिशील शेतकरी विजय झिपरू आहेर (गट नंबर ९८) यांनी रविवारी आपल्या लाल रंगाच्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये विक्रीसाठी सुमारे ३० ते ३२ क्विंटल कांदा भरलेला होता. सोमवारी मार्केट बंद असल्याने मंगळवारी सदर ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये भरलेला कांदा विक्रीसाठी नेण्यात येणार होता. मात्र, विजय आहेर यांचा मळा राष्ट्रीय की महामार्गाला लागून असल्याने चाळीचे शेड व पाठीमागे जवळच आहेर यांचे राहते घर असल्याने या शेडमध्ये कांदा भरलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीसह उभा होता. दरम्यान रात्री साडेदहाच्या सुमारास आहेर कुटुंबीयांनी याबाबत खातरजमा करून सदर शेडला दोन्ही बाजूंनी कुलूपही लावले होते.

# देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या सेंटर ऑफ एक्सलन्सचे भूमिपूजन

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'चे भूमिपूजन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुणे कृषी महाविद्यालयाच्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागात पार पडले. यानिमित्ताने नवीन अवजारे शेड याचे भूमिपूजन व नूतनीकरण केलेला मुक्त संचार गोठा व नवीन पर्यावरण नियंत्रित गोठ्याचे उद्घाटनही करण्यात आले. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा आणि राहुरी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू प्रशांतकुमार पाटील यांनी आपले मत मांडले. या केंद्रामध्ये देशातील पहिले गो पर्यटन केंद्र सुरु करण्यात येणार असून यासाठी मदत करण्यासाठी मी नेहमी तत्पर असेन अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

याप्रसंगी राज्याच्या गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू कर्नल डॉ. प्रशांतकुमार पाटील, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद (कृषी परिषद), पुणे चे उपाध्यक्ष तुषार पवार, रावसाहेब भागडे, डॉ. विठ्ठल शिर्के, पुणे कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, विद्यापीठाचे अभियंता मिलिंद ढोके, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने व या प्रकल्पाचे तांत्रिक प्रमुख डॉ. धीरज कंखरे हे उपस्थित होते.

### देशातील पहिले गो पर्यटन केंद्र सुरु करण्यात येणार

राज्यभरातील ५००० पेक्षा अधिक गोशाळांना भेटी देऊन त्याच्या आधारे देशी गाय संवर्धनासाठी जी-१० व्हिजन डॉक्युमेंट आम्ही प्रस्तावित केले आहे. यामध्ये प्रामुख्याने गो संवर्धन, गो संशोधन, गो संरक्षण, गो सेवा, गोमय प्रक्रिया, गो मूल्यवर्धन, गोशाळा, गो शेती, गो टुरिझम, गो साक्षरता असे उपक्रम राबविले जाणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

### शेतकऱ्यांनाही होणार लाभ

## एक निवडणूक प्रस्ताव मागे घेण्याची केरळची विनंती

# एक देश, एक निवडणूक असंवैधानिक

देशोन्नती वृत्तसंकलन

**तिरुवनन्तपुरम** : गेल्या अनेक दिवसांपासून देशात 'एक देश, एक निवडणूक' घेण्याची मागणी होत आहे. यासंदर्भात माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीने 'एक देश, एक निवडणूक' धोरणबाबत अनुकूल मत दर्शवत एक अहवाल सादर केला होता. उच्चस्तरीय समितीचा हा अहवाल गेल्या महिन्यात केंद्रीय मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात आल्यानंतर त्याला मंजुरी मिळाली आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात सरकार यासंदर्भातील विधेयक मांडू शकते, अशी चर्चा आहे. मात्र, त्याआधीच केरळ विधानसभेने 'एक देश, एक निवडणूक' विरोधात ठराव संमत करत असंवैधानिक म्हटले आहे.

केरळ विधानसभेने केंद्र सरकारला एक देश, एक निवडणूक प्रस्ताव मंजूर करण्याचा निर्णय मागे घेण्याची विनंती करणारा ठराव मंजूर केला आहे. मंजूर झालेल्या ठरावात एक देश, एक निवडणूक प्रस्ताव असंवैधानिक ठरवण्यात आला आहे. केरळ राज्याचे विधिमंडळ कामकाज मंत्री एम.बी. राजेश यांनी म्हटले की, एक देश, एक निवडणूकमुळे देशाच्या संसदीय लोकशाहीच्या वैविध्यपूर्ण स्वरूपाला हानी पोहोचेल.

### संविधानाच्या सूत्रधारांचा विचार

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी सांगितले की, एकाचवेळी निवडणुका घेण्याचा विचार संविधानाच्या सूत्रधारांनी केला होता. त्यामुळे ते असंवैधानिक असू शकत नाही. एक देश, एक निवडणूक ही लोकप्रिय घोषणा आहे, ज्याचा काही लोकांनी चुकीचा अर्थ लावला आहे. योजना लागू करण्यासाठी आवश्यक असलेल्या घटनादुरुस्तींवर अंमलबजावणी समिती विचार करेल आणि त्यानंतर अंतिम निर्णय संसदेला घ्यावा लागेल.

## दिल्ली-चेन्नई फ्लाइटमध्ये प्रवाशाने केला महिलेचा विनयभंग

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली**: अलीकडच्या काळात फ्लाइटमध्ये विनयभंगाच्या घटना वाढल्या आहेत. पुन्हा एकदा विनयभंगाची घटना घडली. चेन्नई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी दिल्ली-चेन्नई फ्लाइटमध्ये एका महिलेचा विनयभंग करण्यात आला. या घटनेतील आरोपी प्रवाशाला अटक करण्यात आली आहे. त्याचे वय ४३ वर्षे असल्याचे सांगण्यात येत आहे. दिल्ली-चेन्नई इंडिगो विमानात एका महिला प्रवाशाचा विनयभंग झाल्याची घटना समोर आली आहे. महिलेच्या तक्रारीनंतर या प्रवाशाला अटक करण्यात आली. या संदर्भात एअरलाइन्सकडून अद्याप कोणतेही वक्तव्य आलेले नाही.

आरोपी मार्बल आणि फरशा बसविण्याचे काम करतो, असे सांगितले जाते.

ही घटना ९ ऑक्टोबर रोजी घडली, ज्यामध्ये महिलेने आरोप केला आहे की, राजेश शर्मा नावाचा प्रवासी फ्लाइटमध्ये प्रवास करत होता. तो फ्लाइटमध्ये महिलेच्या शेजारी बसला होता. यादरम्यान त्याने महिलेला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. आक्षेप घेऊनही हे कृत्य सुरूच राहिल्याचे महिलेने तक्रारीत म्हटले आहे.

## ऑस्ट्रेलियाच्या संग्रहालयात पेस्टो नावाचा अनोखा पेंग्विन

देशोन्नती वृत्तसंकलन

**ॲक्वेरियम** : पेंग्विन नाव ऐकताच एक पांढऱ्या आणि काळ्या रंगाच्या प्राण्याचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते; परंतु याहून वेगळा दिसणारा पेस्टो नावाचा अनोखा पेंग्विन आहे. सोशल मीडियावर सध्या हो पेंग्विन व्हायरल होत आहे. या अनोख्या पेंग्विनला पाहण्यासाठी ऑस्ट्रेलियन ॲक्वेरियममध्ये लोक गर्दी करत आहेत. तर इंटरनेटवरही याची मोठी चर्चा सुरू आहे. पेस्टो नावाचा हा पेंग्विन काही प्रमाणात अत्यंत वेगळा दिसून येतो.

ॲक्वेरियममध्ये प्रेमळ आणि भरभक्कम दिसणारा पेस्टो हा काळ्या आणि पांढऱ्या रंगाच्या पेंग्विनदरम्यान वेगळा दिसून येतो. लोक याला 'लाइन-बॅकर' म्हणत आहेत. हा पेंग्विन चॉकलेट ब्राउन रंगाचा आहे. त्याचे शीर त्याच्या परिवाराच्या सदस्यांपेक्षा अधिक मोठे आहे आणि

प्रेक्षकांचे मनोरंजन करणे त्याला अत्यंत पसंत आहे. हा पेंग्विन जवळपास ९ महिन्यांचा असून त्याचे वजन आताच सुमारे ५० पाउंड आहे. त्याच्या आईवडिलांच्या वजनापेक्षाही हे प्रमाण अधिक आहे. चालू वर्षाच्या प्रारंभी जन्मलेल्या पेस्टोने केवळ स्वतःच्या मनमोहक कृत्यांमुळे नव्हे स्वतःच्या प्रभावशाली आकारासाठी जगभरातील लोकांची मने जिंकली आहेत असे सी लाइफ मेलबर्नने म्हटले आहे.

## पीएम मोदींनी अर्पण केलेला देवी कालीचा मुकुट चोरीला

देशोन्नती वृत्तसंकलन

**ढाका** : ५१ शक्तिपीठांपैकी एक मानल्या जाणाऱ्या बांगला देशातील सतखीरा येथील जशोरेश्वरी मंदिरातील काली देवीचा सोन्या-चांदीचा मुकुट चोरीला गेल्याचे वृत्त आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांगला देश दौऱ्यादरम्यान देवीला हा मुकुट अर्पण केला होता. जशोरेश्वरी काली मंदिर हे ५१ शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. हे मंदिर ४०० वर्षे जुने असल्याचे सांगितले जाते.

जशोरेश्वरी मंदिराचे पुजारी पूजेनंतर निघून गेल्यानंतर काही वेळातच गुरुवारी दुपारी सोन्या- चांदीने मढवलेला मुकुट चोरीला गेला. सफाई कर्मचाऱ्यांना नंतर देवीच्या

डोक्यावरील मुकुट गायब असल्याचे दिसून आले, असे वृत्त बांगला देशी वृत्तपत्र द डेली स्टारने दिले आहे. पंतप्रधान मोदी यांनी मार्च २०२१ मध्ये बांगला देश दौऱ्यादरम्यान जशोरेश्वरी मंदिराला भेट देऊन पूजा केली. त्यांनी देवीला मुकुट अर्पण केला होता. या मंदिराची पिढ्यान्पिढ्या जे कुटुंब देखभाल करत आहे; त्या कुटुंबातील सदस्य ज्योती चट्टोपाध्याय यांनी बांगला देशातील मीडियाशी बोलताना सांगितले की, देवीचा मुकुट हा सोन्या-चांदीने मढवलेला होता.

## देवीच्या हजाराहून अधिक मूर्ती असणारे मंदिर

देशोन्नती वृत्तसंकलन

**क्योटो** : जगात चमत्कारी मंदिर केवळ भारतातच नाहीत. जपानच्या क्योटो येथील एक मंदिर स्वतःच्या चमत्कारी उपचारासोबत अनोख्या एक हजाराहून अधिक सुंदर मूर्तींसाठी ओळखले जाते. संजूसांगेन-डो मंदिर ११६४ साली निर्माण करण्यात आले होते, यातील प्रत्येक मूर्ती दयेची देवी कन्नन यांची आहे. मंदिराच्या नावाचा अर्थ स्तंभांदरम्यान ३३ रिक्त स्थान असलेला हॉल असा होतो, जे याच्या अनोख्या संरचनेला दर्शवितात. लोक येथील मूर्तींची विशाल संख्या पाहून चकित होत असतात.

क्योटोमधील संजूसांगेन-डो एक बौद्ध मंदिर असून ते मूर्तींच्या स्वतःच्या प्रभावशाली संग्रहासाठी ओळखले जाते. अधिकृतपणे रेंगेओ-इन संबोधिल्या जाणाऱ्या या

### प्रत्येक मूर्तीचे डिझाइन आहे वेगळे

मंदिराचा इतिहास समृद्ध आहे आणि याची अनोखी वैशिष्ट्ये याला एक दर्शनीय स्थळाचे स्वरुप प्राप्त करून देतात. संजूसांगेन-डो नाव इमारतीच्या वास्तुकलेला दर्शविते, ज्याच्या स्तंभांदरम्यान ३३ रिक्त स्थान असून ज्यात मूर्ती १० रांगांमध्ये आणि ५० स्तंभांमध्ये व्यवस्थित आहेत. मंदिराची मध्यवर्ती स्थानातील मूर्ती एक मोठी आणि बसलेल्या हजार सशस्त्र कन्न आहेत, ज्याच्या दोन्ही बाजूला ५०० उभ्या कन्नन देवीच्या मूर्ती आहेत. ही मध्यवर्ती आकृती जपानी बौद्धकलेची एक उत्कृष्ट कलाकृती आहे. मूर्ती जपानी सायप्रसच्या लाकडाद्वारे तयार करण्यात आल्या आहेत. सामग्रीच्या या पर्यायामुळे शतकांपासून मूर्तींना संरक्षित करण्यास मदत मिळाली आहे. अनेक मूर्तींवर सोन्याचे आच्छादन देण्यात आल्याने त्यांना चमकदार स्वरुप प्राप्त झाले आहे. हे सोन्याचे आवरा कन्नन देवीच्या दिव्य स्वरुपाचे प्रतीक आहे.

११६४ साली सम्राट गो-शिराकावा यांच्या आदेशावर या मंदिराची निर्मिती करण्यात आली होती. आग लागल्याने मूळ वास्तू नष्ट झाल्यावर १२६६ मध्ये पुन्हा याची निर्मिती करण्यात आली. १२० मीटर लांब संजूसांगेन-डो जपानमध्ये सर्वात लांब लाकडाची संरचना आहे.

## मोफत आयव्हीएफमुळे १० जोडप्यांना 'गोड बातमी'

**पणजी** : आरोग्य खात्याने सुरू केलेल्या मोफत आयव्हीएफ उपचार पद्धतीमुळे १० जोडप्यांना गोड बातमी मिळण्याची शक्यता आहे. ही उपचार पद्धती घेतलेल्या पहिल्या २५ पैकी १० रुग्णांची गर्भधारणेसाठी सकारात्मक चाचणी झाली आहे. यातील एका रुग्णाला जुळ्या मुलांची अपेक्षा असल्याचे आरोग्यमंत्री विश्वजीत राणे यांनी सांगितले.

मोफत आयव्हीएफ उपचारपद्धती देणारे गोवा हे देशातील पहिले राज्य आहे. मंत्री राणे यांनी समाजमाध्यमांतून ही माहिती दिली आहे. गोवा वैद्यकीय महाविद्यालयात (गोमेकॉ) येथील मोफत आयव्हीएफ प्रदान करण्याचा उपक्रम जैविकदृष्ट्या गर्भधारणेसाठी संघर्ष करणाऱ्या जोडप्यांचे जीवन बदलत आहे.

## भोले बाबांनी न्यायिक आयोगासमोर दिला जबाब

### हाथरस चेंगराचेंगरी प्रकरणी

देशोन्नती वृत्तसंकलन

**लखनौ** : येथे आयोजित एका सत्संगात १२१ भक्तांच्या मृत्यूप्रकरणी बाबा नारायण साकार हरी लखनौ येथील सचिवालयात न्यायिक आयोगासमोर हजर झाले आणि त्यांनी त्यांचे म्हणणे नोंदवले. या काळात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. भोले बाबा म्हणून त्यांच्या भक्तांमध्ये प्रसिद्ध असलेले नारायण हरी हे भाजपचा झेंडा घेऊन पांढऱ्या फॉर्च्युनर कारमधून न्यायिक आयोगात पोहोचले.

हे वाहन आमदार बाबुराम पासवान यांचे असल्याचे सांगितले जात आहे. आपला जबाब नोंदवून बाबा निघून गेले. यावेळी त्यांचे वकील एपी सिंह म्हणाले की, आम्हाला राजेश यादव उर्फ फौजीविरुद्ध कट रचल्याचा संशय आहे. आमचा योगी सरकार आणि न्याय व्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे. गेल्या जुलैमध्ये हाथरसच्या सिकंदरराव येथील फुलराई मुगलगढी गावात नारायण साकार हरी भोले बाबा उर्फ सूरजपाल यांच्या सत्संगाच्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीत १२१ जणांचा मृत्यू झाला होता. त्यांचा ताफा बाहेर काढण्यासाठी सेवेदारांनी गर्दी थांबवली होती, त्यादरम्यान लोक त्यांचे पदस्पर्श दर्शन घेण्यासाठी चढाओढ करू लागले.

**नवी मुंबई** : आंतरराष्ट्रीय विमानतळावर इतिहास घडला. काम सुरू असलेल्या या विमानतळाच्या धावपट्टीवरून चक्क हवाई दलाचे एसयू-३० जातीच्या सुखोय विमानाने टेकऑफ केले. याचवेळी हवाई दलाचे सी-२९५ विमानाचेही धावपट्टीवर लॅण्डिंग केले. या विमानावर पाण्याचे फवारे सोडून स्वागत करण्यात आले.

## किन्नौरमध्ये चिनी सीमेलगत तीन पूल तयार

देशोन्नती वृत्तसंकलन

**रामपूर** : भारत-तिबेट सीमेला जोडण्यासाठी बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनने राष्ट्रीय महामार्ग-५ वर कोटी रुपये खर्चून तीन पुलांचे बांधकाम पूर्ण केले आहे. या पुलांच्या बांधकामामुळे सीमाभागातील लोकांना, भारतीय लष्कर आणि आयटीबीपीच्या जवानांना मोठा दिलासा मिळणार आहे. १२ ऑक्टोबर रोजी संरक्षण मंत्री राजनाथसिंह या पुलांचे ऑनलाइन उद्घाटन करणार आहेत.

सामरिकदृष्ट्या महत्त्वाच्या भारत-तिबेट सीमेला जोडणाऱ्या

### लष्कर आणि स्थानिकांना मिळणार सुविधा

राष्ट्रीय महामार्ग-५ वरील सीमावर्ती भागातील लोकांच्या सुरळीत वाहतूक आणि सोयीसाठी दोन वर्षांपूर्वी तीन ठिकाणी पूल बांधण्याचे काम सुरू झाले. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन पोवारी आणि समडो यांनी दोन वर्षांत हे पूल पूर्ण केले आहेत. शिपकिला हद्दीतील खाब नामग्या येथे ६५ मीटर लांबीचा पूल तयार आहे. यासाठी सुमारे चार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. याचा फायदा शिपकिला आणि नामग्या पंचायतीच्या ग्रामस्थांसह लष्कराला होणार आहे.

## शस्त्र घेऊन पळालेल्या जवानाला अटक

देशोन्नती वृत्तसंकलन

**उधम सिंग नगर** : आसाममधून रायफल, काडतुसे आणि मॅगझिनसह फरार झालेल्या बंगालच्या अभियंता सैनिकाला पोलिसांनी खतिमा येथील हॉटेलमधून अटक केली. पोलिसांनी त्याच्याकडून एक इन्सास रायफल, ६० काडतुसे आणि चार मॅगझिन जप्त केल्या आहेत. पकडलेल्या सैनिकाची आर्मी इंटेलिजन्स, आयबी आणि एलआययूने चौकशी केली. शिपायाला

### रायफलसह ६० काडतुसे जप्त

न्यायालयात हजर करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नायब सुभेदार रवींद्रसिंग यादव ईएमई बटालियन यांनी ५ ऑक्टोबर २०२४ रोजी बोरपठार पोलीस स्टेशन, जिल्हा कार्बी आंगलॉंग, आसाम येथे चंपावत येथील जवान सूरज जोशी याने वाहनातून उडी मारून फरार झाल्याची तक्रार नोंदवली होती.

## प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेला मुदतवाढ

**नवी दिल्ली**: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्राच्या कॅबिनेटची बैठक पार पडली. या मंत्रिमंडळ बैठकीत प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत पोषणतत्वांनी संपन्न असा तांदूळ मोफत देण्यात येतो त्यास आणि इतर कल्याणकारी योजनेंतर्गत मुदत जुलै २०२४ वरून डिसेंबर २०२८ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्र सरकारच्या या योजनेमुळे ८० कोटी पात्र लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य मिळणार आहे.

## स्वच्छतेच्या अभावी ३० टक्के मुलींना समस्या

देशोन्नती वृत्तसंकलन

**पणजी** : राज्यात मासिक पाळीच्या दरम्यान स्वच्छतेच्या अभावामुळे मुलींना होणाऱ्या आजारांत वाढ झाली आहे. गोवा होमिओपॅथी वैद्यकीय संशोधन केंद्राने (सीआरयूएच) केलेल्या सर्वेक्षणात ही माहिती आढळून आली आहे. सर्वेक्षण केलेल्या एकूण ४०० मुलींपैकी १२० (३० टक्के) मुलींना विविध प्रकारचे आजार असल्याचे स्पष्ट झाले आहे. अन्य मोठ्या राज्यांच्या तुलनेत गोव्यात आढळलेले प्रमाण जास्त

हे सर्वेक्षण जून ते ऑगस्ट या महिन्यांत केले होते. या तीन शाळांमधील ९ ते १९ वर्षे वयोगटातील ४०० मुलींचे सर्वेक्षण करण्यात आले. आम्ही या मुलींना मासिक पाळीच्या दरम्यान आवश्यक असणाऱ्या स्वच्छतेबाबत काही प्रश्न विचारले होते. त्यांनी दिलेली उत्तरे आणि तपासणीवरून काही मुलींमध्ये या काळात आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या स्वच्छतेची माहिती नसल्याचे स्पष्ट झाले.

### असे होते सर्वेक्षण...

जून ते ऑगस्ट महिन्यांत तीन शाळांमधील ९ ते १९ वर्षे वयोगटातील ४०० मुलींचे केले सर्वेक्षण

मुलींना मासिक पाळीच्या दरम्यान आवश्यक असणाऱ्या स्वच्छतेबाबत काही प्रश्न विचारण्यात आले. त्यांनी दिलेल्या उत्तरांवरून आणि तपासणीवरून काही मुलींना आवश्यक स्वच्छतेची माहिती नसल्याचे दिसून आले. काही मुलींमध्ये पीसीओडी, पेल्विस किंवा मूत्राशयाचा संसर्ग, लिकोरिया असे आजार आढळले.

असल्याचे सीआरयूएचचे प्रभारी डॉ. हनुमान राम यांनी सांगितले. अधिक माहिती देताना डॉ. हनुमान राम म्हणाले केंद्रीय आयुष खात्यातर्फे मागील १०० दिवसांत विविध लोकोपयोगी उपक्रम राबवण्यात आले

### सीआरयूएचचे सर्वेक्षण

आहेत. यानुसार केंद्रीय होमिओपॅथी संशोधन संस्थेतर्फे देशभरातील ३० केंद्रांमध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी आरोग्य संशोधन उपक्रम राबवण्यात आला होता.

## महादेव बेटिंग ॲपचा प्रमोटर सौरभ चंद्रकरला अटक

### दुबईत करण्यात आली अटक

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली**: महादेव बेटिंग ॲपचा प्रमोटर सौरभ चंद्रकर याला दुबईहून अटक करण्यात आली. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) इंटरपोलला केलेल्या विनंतीनुसार सौरभच्या विरोधात रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात आली होती. त्यानुसार ईडी, परराष्ट्रीय मंत्रालय आणि गृहमंत्रालयाच्या समन्वयातून सौरभला अटक झाली आहे.

याबाबत अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, यूएई अधिकाऱ्यांनी काल परराष्ट्र मंत्रालयाशी अधिकृतपणे संवाद साधून सौरभ चंद्रकर याला दुबईत अटक केल्याची माहिती दिली. सौरभच्या प्रत्यार्पण प्रक्रिया पुढील काही दिवसांत पूर्ण होईल आणि त्याला भारतात प्रत्यार्पण करण्यासाठी यूएई प्राधिकरणाकडे विनंती केल्याचे ईडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

## भारताचे वस्त्रोद्योग क्षेत्र ३५० अब्ज होणार?

### सरकारचे अनेक उपक्रम सुरू

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे** : ऑगस्ट २०२४च्या व्यापार आकडेवारीनुसार तयार कपड्यांच्या (आरएमजी) निर्यातीत ११ टक्के वार्षिक वाढ झाली असून भारताच्या वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये लक्षणीय विस्तार होण्याची शक्यता आहे. गुंतवणूक आणि निर्यातीला सर्वाधिक प्रोत्साहन देणाऱ्या भारताच्या अंतर्गत क्षमता आणि मजबूत धोरणात्मक चौकटींमुळे या क्षेत्राचा २०३० पर्यंत ३५० अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत विस्तार होण्याचा अंदाज आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सरकार अनेक योजना आणि

धोरणात्मक उपक्रम राबवत आहे. पुढील ३-५ वर्षांत पंतप्रधान मेगा इंटिग्रेटेड टेक्सटाईल रिजन अँड ॲपरेल (पीएम मित्र) पार्क आणि उत्पादन आधारित प्रोत्साहन (पीएलआय) योजनेद्वारे ९०,००० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक अपेक्षित आहे, तर राष्ट्रीय तांत्रिक वस्त्रोद्योग मिशनसारख्या योजना भारताला तांत्रिक वस्त्र क्षेत्रात जागतिक आघाडीवर नेण्याची अपेक्षा आहे.

## युवा पिढीने देशाचे सांस्कृतिक राजदूत व्हावे

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई** : देशाचे सांस्कृतिक राजदूत व्हा, असे आवाहन केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनी युवा पिढीला केले आहे. ते नवी मुंबई येथे डी.वाय.पाटील विद्यापीठात आयोजित विकसित भारत ॲम्बेसेडर-युवा कनेक्ट कार्यक्रमात बोलत होते. भारत हे अनेकानेक जागतिक पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. हे लक्षात घेऊन युवा आणि विद्यार्थ्यांनी देशाची संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे वाहक आणि संरक्षक व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. देशातील युवा विकसित भारताचे निर्माते राहणार असून भविष्यात विकसित भारतात राहणारे लोक

### गजेंद्रसिंह शेखावत यांचे आवाहन

विकसित भारत घडवण्याचे श्रेय आजच्या युवा पिढीला देणार असल्याचे प्रतिपादन शेखावत यांनी यावेळी केले. वसाहतवादी राज्यकर्त्यांपासून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या थोर स्वातंत्र्यसैनिकांचे स्वप्न पूर्ण करण्याचे आवाहन त्यांनी केले. वर्ष २०४७ मध्ये विकसित भारत घडवण्यासाठी राष्ट्र उभारणीत योगदान देण्याची हीच वेळ आणि संधी आहे, हीच आपल्या स्वातंत्र्यसैनिकांना खरी आदरांजली ठरेल, असे शेखावत यांनी सांगितले.

## केंद्र सरकारकडून ११,२५५ कोटींचे कर हस्तांतरण

### कल्याणकारी उपक्रमांना मिळणार चालना

देशोन्नती वृत्तसंकलन

**सोलापूर** : महाराष्ट्राला केंद्र सरकारकडून ११,२५५ कोटी रुपये कर हस्तांतरण जारी करण्यात आले आहे. या निधीच्या रक्कमेत आगामी सणासुदीच्या काळात भांडवल खर्च भागविण्यासाठी एका अग्रिम हप्त्याच्या रक्कमेचाही समावेश आहे. उर्वरित निधी रक्कम ही राज्यांच्या विकास तसेच कल्याणकारी उपक्रमांना गती देण्यासाठी आहे.

केंद्र सरकारने सर्व राज्य सरकारांना १,७८,१७३ कोटी रुपयांचे कर हस्तांतरण जारी करण्याचा निर्णय घेतला असून, यात ऑक्टोबर, २०२४ मध्ये देय असलेल्या नियमित हप्त्याव्यतिरिक्त ८९,०८६.५० कोटी रुपयांच्या एका अग्रिम हप्त्याचा समावेश आहे. या हस्तांतरणाचा उद्देश आगामी सणासुदीच्या काळात राज्यांना भांडवली खर्चात मदत करणे आणि त्यांच्या विकास तसेच कल्याणकारी उपक्रमांना गती देण्याचा आहे. महाराष्ट्राला या हस्तांतरणातून ११,२५५ कोटी रुपये मिळाले आहेत.

# ग्रामीण भागात थिन व्हाईट टॉपिंगचा प्रयोग!

**विकास** | आ.लक्ष्मण पवारांच्या प्रयत्नाला यश

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ.लक्ष्मण पवार यांच्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री ग्रामसडक योजना संशोधन व विकास अंतर्गत तालुक्यातील ७ गावच्या एकूण ४० कीमी रस्त्यासाठी थिन व्हाईट टॉपिंग नुसार ६५ कोटी रुपयांचा निधीला १८ जुलै २०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली असून हे सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटने होणार असून ग्रामीण भागातील रस्त्यासाठी होणारा हा महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग असून संबधित गावच्या रस्त्याचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहे.

आ. लक्षण पवार यांच्या माध्यमातून तालुक्यातील ग्रामीण भागातील जवळपास सर्वच रस्त्याचे प्रश्न मार्गी लागले असून राहिलेल्या आणखी सात गावच्या ४० किमी रस्त्यासाठी पुन्हा ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून हे सर्व रस्ते पूर्ण सिमेंट कॉक्रीटीकरण होणार असून लवकरच या रस्त्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. यामध्ये तलवाडा रोड ते रेवकी–देवकी व गोंदी या १२.२० किमी रस्त्यासाठी २७ कोटी रुपये, रामपुरी ते ढालेगाव या ४.७० किमी रस्ता ७ कोटी ४४ लक्ष रुपये, सुर्डी फाटा ते सेलू ३.५०.किमी रस्ता ५ कोटी २४ लक्ष रुपये, लोणाला फाटा ते खेर्डावाडी– सिंदफना चिंचोली ४.६० किमी रस्त्याला ६ कोटी ६८ लक्ष रुपये, जातेगाव रोड ते मुधापुरी ५.६१ किमी रस्त्याला ७ कोटी ९१ लक्ष रुपये, राष्ट्रीय महामार्ग (सावरगाव) ते चिखली ४.२० किमी रस्त्याला ६ कोटी २८ लक्ष रुपये, चकलांबा रोड ते ब्रम्हगाव ३.१० किमी रस्त्याला ४ कोटी ३९ लक्ष रुपये असा एकूण ४० किमी रस्त्यासाठी ६५ कोटी रुपयांच्या निधीला १८ जुलै २०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली असून हे सर्व रस्ते थिन व्हाईट टॉपिंग नुसार पूर्णपणे सिमेंट कॉक्रीटीकरनाणे पूर्ण होणार आसून ग्रामीण भागातील रस्त्यासाठी हा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग असून यामुळे हे रस्ते वर्षानुवर्षे टिकून राहतील असे सांगण्यात आले. दरम्यान येत्या दोन दिवसात या सर्व रस्ता कामाचे उदघाटन होणार आसून लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याचे आ.लक्ष्मण पवार यांच्या कार्यालयाकडून कळवण्यात आले आहे.

# अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करणार

## डॉ.अंजली घाडगे: केज निवडणूक वातावरण तापले

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिक्षण व विकासापासून वंचित घटकांना शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे, या प्रेरणेतून केज येथे महात्मा फुले शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ रोवणारे, शिक्षणापासून कोसों दूर असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सैक्षणिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी मागासवर्गीय वसतिगृह सुरु करणारे कै. राम घाडगे गुरुजी यांचे राजकारणातील अपूर्ण राहिलेले स्वप्न साकारण्यासाठी बारा वर्षांपासून राजकारणात सक्रिय असलेल्या त्यांच्या कन्या डॉ. अंजली घाडगे केज अंबाजोगाई मतदार संघात आमदारकी लढविण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. केज विधानसभा मतदारसंघात जनमानसात संपर्क वाढवत झंझावात निर्माण करून त्यांनी राजकीय पकड मजबूत केल्याचे दिसून येते. तसेच केज मतदारसंघामधे आपण विधानसभा निवडणूक लढवणार असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची उमेदवारी ही आपणासच मिळणार आहे आणि या निवडणुकीत आपणच जिंकणार आसल्याचा विश्वास डॉ अंजलीताई घाडगे यांनी व्यक्त केला आहे. केज विधानसभा मतदारसंघात डॉ अंजलीताई घाडगे यांना गावागावातून मतदारांचा प्रचंड

पान २ वर...

# आंबेडकरी जनतेने आजच्या मोर्चात सामील व्हावे!

## वडमारे:बीड रेल्वे स्टेशनला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचेच नाव राहील!

बीड /पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यातीलच नव्हे तर सबंध महाराष्ट्रातील आमदार खासदार लोकप्रतिनिधी याना माझी विनंती आहे की बीड जिल्हा येथे होत असलेल्या रेल्वे स्टेशनला महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी आपण लेखी स्वरूपाचे पत्र द्यावे अन्यथा येणाऱ्या निवडणुकीत आंबेडकर समाजाच्या मतदानापासून आपल्याला वंचित राहावे लागेल आंबेडकर समाज आपल्यावर बहिष्कार टाकेल मतदान करणार नाहीत महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये भाजप सरकारने सर्वसामान्य लोकांना सत्तेच्या जीवावर चिरडण्याचाच काम केलं आहे सत्तेची मस्ती सामान्य लोकांवर दाखवत आहेत मग ते महाराष्ट्रातील आंदोलन असो किंवा देशातील आंदोलन असेल बीड येथे रेल्वे स्टेशनला भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव सामाजिक कार्यकर्त्यांनी दिले म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला लाठी चार्ज करण्यात आला.

महिलांना मारण्यात आले एवढेच नाही तर लोकशाही मार्गाने आंबेडकर समाजाच्या वतीने दलित समाजाच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत शांततेत निघणाऱ्या रेल्वे सुद्धा पोलीस प्रशासनाने परवानगी नाकारली आहे एकीकडे बीड शहरामध्ये लाखो कोटीच्या संख्येने जनसमुदाय जेव्हा मोर्चा काढतो आंदोलन करतो उपोषण करतो त्यावेळेस प्रशासनाला वेगवेगळ्या लागतात आणि दलित आंबेडकरी समाजाला कोणताही सामाजिक किंवा सार्वजनिक कार्यक्रम करायचा असेल किंवा आंदोलन उपोषण करायचा असेल तर प्रशासनाच्या वतीने परवानगी नाकारली जाते गुन्हे दाखल करण्याची धमकी दिली जाते गुन्हे दाखल केले जातात अटक केले जात आहे लाठीचार्ज केला जात आहे या पद्धतीच पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन हे काम करत आहे यावरून भाजप सरकारचा हे संगी प्रशासन काम करत आहे ज्या पद्धतीने इतिहासामध्ये सर्वसामान्य लोकांना जगण्याचा अधिकार नव्हता समानतेचा अधिकार नव्हता त्याच पद्धतीची वागणूक आता पुन्हा आरएसएस प्रणित हे भाजप प्रशासन करत आहे बीड येथे रेल्वे स्टेशनला महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिले म्हणून गुन्हा दाखल केला आहे याच्या निषेधार्थ व बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारकापासून ते कलेक्टर ऑफिस पर्यंत लोकशाही मार्गाने काढण्यात येणाऱ्या मोर्चाला प्रशासनाने परवानगी नाकारली याचा निषेध म्हणून आंबेडकरी समाजाच्या वतीने उद्या आंबेडकर पुतळ्यापासून ते जिल्हाधिकारी कार्यालय परंतु मोर्चाचे आयोजन केले आहे हा मोर्चा शांततेच्या मार्गाने आहे सरकारच्या निषेधार्थ आहे बीड जिल्ह्याच्या एसपींना माझी विनंती आहे महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांना पान २ वर...

# रेल्वे नामकरण आंदोलनास ठोस आश्वासन द्यावे!

## राजेंद्र मस्के:प्रशासनाने दखल घेण्याची मागणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

अहिल्यानगर – बीड – परळी रेल्वे मार्गावरील बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी माजी सैनिक अनुरथ सोपान वीर यांचे गेली चार दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर तीव्र अन्नत्याग उपोषण चालू असून, त्यांनी जलत्यागही सुरु केला आहे. प्रशासनाने या आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी. वीर यांना ठोस आश्वासन देऊन, उपोषण मागे घेण्यासाठी तातडीने प्रयत्न करावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

आज जिल्हाधिकारी कार्यलयासमोर माजी सैनिक अनुरथ वीर यांचे चालू असलेल्या उपोषण स्थळी राजेंद्र मस्के यांनी भेट देऊन प्रकृतीची चौकशी केली. यावेळी आंबेडकर चळवळीचे कार्यकर्ते उपस्थित होते. बीड जिल्हा हा मागास जिल्हा, गतिमान विकासासाठी रेल्वेची गरज असते. अहिल्यानगर – बीड – परळी हा रेल्वे मार्ग होण्यासाठी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, पत्रकार, तरुण युवक अशा विविध क्षेत्रातील अनेकांनी पुढाकार घेऊन, रेल्वे मंजुरीसाठी आंदोलने केली. जनतेची मागणी लक्षात घेऊन, स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी रेल्वे मार्ग मंजुरीसाठी स्वत: पुढाकार घेतला. केंद्र व राज्य सरकारने संयुक्तिकपणे भरीव आर्थिक तरतूद केली. पुढे तत्कालीन खासदार प्रितमताई मुंडे यांनी भाजपा महायुती केंद्र सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा करून निधी आणला. अहिल्यानगर ते आष्टी रेल्वे मार्गाचे काम पूर्ण झाले असून, पुढील काम अंतिम टप्प्यात आहे. आंदोलनातून मंजूर झालेला रेल्वे मार्ग आणि आता बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचे नाव द्यावे यासाठी आंबेडकरी विचाराचे पान २ वर...

# नरेंद्र जावळेसह कार्यकारिणी पदमुक्त

## राजू जोगदंड : रिपाइं कार्यकर्त्यांनी नोंद घ्यावी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पक्षाने दिलेल्या सूचनांचे पालन न करणे, पक्ष वाढीसाठी प्रयत्न न करणे. पक्षाने आयोजित केलेल्या तसेच कोणत्याच आंदोलनात सक्रिय सहभाग न घेणे. त्यामुळे रिपाइं पाटोदा तालुकाध्यक्ष नरेंद्र जावळेसह पाटोदा तालुका कार्यकारिणी पदमुक्त करण्यात आली आहे. अशी माहिती रिपाइं जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी दिली. त्यामुळे पाटोदा तालुका व

जिल्ह्यातील रिपाइं कार्यकर्त्यांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन केले आहे. प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, पाटोदा, तालुकाध्यक्ष नरेंद्र जावळेसह पाटोदा तालुक्यातील कार्यकारिणी शुक्रवार (दि.११) ऑक्टोबर रोजी पदमुक्त करण्यात आली आहे. रिपाइं अध्यक्ष तथा सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष वाढीसाठी काम न करणे या बाबी निदर्शनास आल्यानंतर नरेंद्र जावळेसह पाटोदा तालुका रिपाइं कार्यकारिणी पदमुक्त करण्यात आली आहे.त्यामुळे पाटोदा व जिल्ह्यातील रिपाइं कार्यकर्त्यांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन रिपाइं जिल्हा सरचिटणीस राजू जोगदंड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केले आहे.

**बीड :** शहरातील बालेपीर, रोशनपुरा भागातील शेख आमेर, शेख मुजिब, हूजेबा खान, शेख साहील, शेख फाजील, शेख फैजान आदि कार्यकर्त्यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांच्या गटात जाहीर प्रवेश केला. यावेळी मुखीदलाला, खाजाभाई, ईसा चाऊस आदि.

# निवडणूक तोंडावर कीती बुजगावणे?

## चर्चा: आ.नेमितांना लोक विचारु लागले प्रश्न

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार यांनी निवडणूक तोंडावर वेगळीच शाळा सुरू केली आहे असे नागरिकांतून बोलले जात आहे केज मतदार संघात एकीकडे आमदारा नमीताताई यांचा मराठा आरक्षणाला विरोध आहे असे स्पष्ट दीसत आहे तर दुसरीकडे आमदारा नमीताताई यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी ज्यांना दीला पन निधी कुठे गेला यांचा पत्ता नाही तसेच तेच इच्छुक उमेदवार मराठा आरक्षणासाठी आम्ही हे करणार ते करणार पाटील आम्हालाच उमेदवारी देनार आहेत असे बोलले जात आहे परंतु आमदार नमीताताई यांनी एवढा मोठा निधी दिला आहे तसेच जे जरांगे पाटील यांच्या नावाने मतदार संघात फिरत आहे व जरांगे पाटील यांचा भाजप पक्षाला विरोध आहे असे स्पष्ट दीसत आहे व संध्या जरांगे पाटील यांच्या नावाने मतदार संघात बोंबलत आहे की जरांगे पाटील आम्हालाच उमेदवारी देनार तर अशा इच्छुक उमेदवारांनी फक्त एकदा विद्यमान आमदार नमीताताई मुंदडा यांच्या विरोधात एक तरी वक्तव्य केले का नाही व तसेच इच्छुक उमेदवार यांनी यापुढेही एकदा विद्यमान आमदार यांच्या विरोधात एकच वक्तव्य करावे मग कळेल तुम्ही जरांगे पाटील समर्थक आहेत का मुंदडा समर्थ आहेत का विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांनी मतदार फुटु नाही म्हणून पुढे केलेले बुजगावणे आहेत तेव्हाच कळेच व वेळ प्रसंगी आज जरांगे पाटील समर्थक म्हणून मिरवणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी उद्या अंधारातुन विद्यमान आमदार नमीताताई मुंदडा यांचा प्राचार करु नये असे नागरिकांन मध्ये भावना व्यक्त केल्या जात आहेत.

# केज तालुक्याच्या आरोग्याचे तीनतेरा!

## बोंबला: चार महिन्यापासून सोनोग्राफी मशिन बंद

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज उपजिल्हा रुग्णालयातील गेली एक महिन्यापासून सोनोग्राफी मशीन बंद आहे ग्रामीण भागातील लोक या दवाखान्यामध्ये जास्त येतात परंतु सध्या या दवाखान्याची अशी अवस्था झाली आहे केज तालुक्यातील या उपजिल्हा रुग्णालयामधील सोनोग्राफी मशीन जर बंद असेल तर सर्वसामान्य लोकांनी काय करायचं जर मशीन ना दुरुस्त असेल तर काही हरकत नाही परंतु मशीन मध्ये काहीच प्रॉब्लेम नसताना सुद्धा केज उपजिल्हा रुग्णालयामधील सोनोग्राफी मशीन बंद असेल तर खूप आश्चर्य करण्याची बाब आहे सीएस डॉ. अशोक थोरात तुमच्याच तालुक्यामध्ये जर सर्वसामान्यांचे हे हाल असतील तर इतर तालुक्याचे काय असा प्रश्न निर्माण होत आहे का ती मशीन डॉक्टरांनीच जाणून बुजून बंद ठेवली आहे केज उपजिल्हा रुग्णालयामध्ये जे डॉक्टर ड्युटी करतात त्यांच्या खाजगी हॉस्पिटलमध्ये बऱ्याच डॉक्टरांकडे सोनोग्राफी मशीन आहे त्यामुळे तर पेशंट स्वतःच्या दवाखान्यात यावेत म्हणून तर ही उपजिल्हा रुग्णालय केज येथील मशीन बंद ठेवली नाही ना असा प्रश्न सर्वसामान्य लोकांना उपस्थित होतो आहे महानेता न्युज ने सीएस डॉ अशोक थोरात यांच्या शी संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही. केज विधानसभेच्या आमदार नमिता मुंदडा या सातत्याने स्वतःला लोकप्रिय आमदार समजतात तर त्यांनी याही प्रश्नाकडे लक्ष दिले पाहिजे.

**अंगलट** | दादांच्या लाडक्या जयदत्त नरवडेंची जिभ घसरली?

# माध्यमांची मुंगी चावल्यास लुंगी फिटेल?

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगांव मतदार संघात सध्या विविध विकास कामांच्या उदघाटनाचा जणु धुराळाच उडाला आहे त्यात ज्या त्या परिसरातील आपले पिदडु आमदार सोळंके यांच्याकडुन बोलविते केले जात आहेत. माळेवाडी सुलतानपुर या ठिकाणी हॅम अंतर्गत सादोळा ते राजेगांव या सुमारे ६० कोटींच्या कामाचे उदघाटन रविवारी आचार संहितेच्या भितीपोटी उरकण्यात आले यावेळी पार पडलेल्या छोटेखाणी कार्यक्रमात आ. सोळंके यांचे गचपडीची गोळी खावुन विविध सत्तेच्या पदांचा मलिदा खाणा–या जयदत्त नरवडे यांनी अत्यंत मिश्किलपणे पत्रकारांची खोड काढतांना तुमची सगळीच सोय करण्यात आली आहे असे म्हणुन उपस्थित पत्रकारांना खिजविण्याचा प्रकार केला याला कांही पत्रकार बांधवांनी लगेचच विरोध केल्यावर माफीचे सोयिस्करही त्यांनी पार पाडले परंतु स्वतःच्या परिसरात होत असलेल्या कार्यक्रमात जयदत्त नरवडेंची देखील संबंधीत कंत्राटदार एजन्सीने चांगलीच व्यवस्था केलेली दिसते त्यामुळेच नरवडे यांना आपली जीभ कुठे घसरतेय हे कळले नसावे ? असे आता बोलल्या जात आहे.

माजलगांव आणि गेवराई विधानसभेच्या बांधावर असलेल्या सादोळा ते राजेगांव या परिसराचा विकास तसा खुपच आडगळीला राहिलेला आहे. परंतु मागील काळात होत असलेला जनरेटा पाहुन हॅम अंतर्गत १३ किलोमिटरच्या कामासाठी तब्बल ६० कोटी रुपयांचा पान २ वर...

### मांडीआड करुन खंडी खाताहेत!

जयदत्त नरवडे हे मागील अनेक वर्षांपासुन बाजार समितीत उपसभापती व त्यानंतर आता सभापती म्हणुन मांडी आड करुन खंडी खात आहेत पण त्यांची गत डोळे बंद करुन दुध पिणा–या मांजरागत आहे त्या मांजराला वाटतं डोळे बंद केल्याने आपल्याकडे कुणी पाहात नाही. परंतु असे नसुन बाजार समितीत नरवडेंनी काय काय दिवे लावलेत आणि त्या दिव्यात तेल कुठुन कुठुन आलं हे सर्व माध्यमांना तर सोडाच सर्वसामान्यांनाही माहित आहे त्यामुळे असेच घसरत राहिलात तर माध्यमांची मुंगी तुमच्या कुठल्या भागाला चावेल आणि विविध ठिकाणच्या आपल्या कारभाराची लुंगी कशी फिटेल याची कल्पना सुध्दा तुम्हाला लागणार नाही. अशा प्रतिक्रिया बाजार समितीविषयीच्या जाणकारांमधुन येत आहेत.

# वैद्यनाथ मंदिराच्या शिखरावरच हातोडा!

## खळबळजनक: वैद्यनाथ मंदिर सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिर सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.बारा ज्योतिर्लिंगापैकी एक ज्योतिर्लिंग असलेले परळी वैजनाथ येथील वैद्यनाथ मंदिर हे अतिसंवेदनशील ठिकाण आहे. या मंदिराचा जिर्णोद्धार राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी केला आहे. तसेच मुख्य मंदिराच्या वरती शिखरावर गौतम बुद्धांच्या शिल्प कोरलेले आहे. यापूर्वी या मंदिराला उडवून देण्याच्या धमक्यांचे पत्र आलेले आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या बाबींवर उपाययोजना म्हणून अनेक गोष्टींवर ट्रस्टकडून बंधने घालण्यात आलेली आहेत. मात्र आता परळीचे माजी नगराध्यक्ष राहिलेल्या व्यक्तीने पाच–सात लोक सोबत घेत,फेसबुक लाईव्ह करत थेट वैजनाथ मंदिराच्या कळसापर्यंत जाऊन या ठिकाणी हातोडा चालवत तोडफोड केली आहे. वैजनाथ मंदिराच्या शिखराच्या पायथ्याशी असलेल्या एका खिडकीवजा जागेत बांधकाम करून निर्माण केलेली ही भिंत फोडून टाकण्यात आली आहे. ऐन दसऱ्याच्या दिवशीच आक्रमक भूमिका घेत माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी वैद्यनाथ मंदिराच्या शिखराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील कुलूप तोडून शिखरावर प्रवेश करत बांधकाम करून निर्माण केलेली ही भिंत फोडून टाकली. वैद्यनाथ मंदिराच्या शिखरावर पायथ्याला शिवलिंग होते जुन्या काळापासून या ठिकाणी परळीकर दर्शनाला जायचे मात्र वैद्यनाथ देवस्थान ट्रस्टने हे शिवलिंग काढून टाकून ही जागा बंद केली असुन याबाबत दर्शनाला खुले करण्याची मागणी केली मात्र ट्रस्टने हे केले नाही म्हणून ही भूमिका घ्यावी लागल्याचे दीपक देशमुख यांनी सांगितले.दरम्यान वैद्यनाथ देवस्थान पान २ वर...